विजय काचरे



# भव्य



# दिव्य



# अवाढव्य



ई साहित्य प्रतिष्ठान



# भव्य दिव्य अवाढव्य

## विजय कचरे

### ई साहित्य प्रतिष्ठान

## *भव्य दिव्य अवाढव्य*

## *विजय काचरे*

*BHAVY DIVYA  AVADHHAVYA BY .VIJAY KACHARE*

***vijaykachare@gmail.com***
***मोबाईलः ९८ २२ १६ २१ ८१***

***प्रकाशकः ई साहित्य प्रतिष्ठान***

***सर्व हक्क : सौ.विशाखा काचरे***

***अक्षर जुळणी :***

*विश्वमंगल निर्मिती*

*द्वाराः विजय काचरे*

*डी १७, गुरू गणेश नगर*

*कोथरूड  पुणे ४११ ०३८*

*मोबाईलः ९८ २२ १६ २१ ८१*

***मुखपृष्ठ रेखाटन*** Samhita Hiswankar

*() या विनोदी कथासंग्रहातल्या  कोणत्याही कथेचे ध्वनी प्रसारण अथवा प्रसार माध्यमातनं सादरीकरण करण्याआधी लेखकाची लेखी अनुमती घेणं आवश्यक आहे.*

*() सर्व कथांमधील पात्र, प्रसंग आणि घटना पूर्णपणे काल्पनिक असून त्याचा वास्तव जीवनाशी काहीही संबंध नाही. तसं आढळल्यास तो योगायोग समजावा.*

Published on : 26 january 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून किंवा ऐपद्वारे वाचता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे

ई साहित्य प्रतिष्ठान

*जगण्याला नवा रंग, नवा अर्थ देणाऱ्या*

***श्रीरंगास...***



विजय काचरे

श्री विजय काचरे यांचे प्रकाशित साहित्य

- सव्यापसव्य (कथासंग्रह) १९८०
- वाचनोपनिषद ( समिक्षालेखसंग्रह) २००३
- पर्यावरणशास्त्र ( पाठ्यपुस्तक) २००५
- क्रांतिवीर वसंतराव नाईक : काल आणि कर्तृत्व (चरित्र) २०१२

# अनुक्रम

०१. अमरधाममधलं अजरामर सूत्रसंचालन...

०२. आलीया भोगासी असावे सादर

०३. भव्य दिव्य अवाढव्य ...

०४. बिन पगारी...फुल अधिकारी...

०५. ताणू किती...ताणू किती..कार्यशाळा दचकली

०६. छबीताईंच्या पाककृतीतली खुबी...

०७. मंगल कार्यालय बायांनी आक्रमिले! !

०८. पसायदान हे

०९. अशी ही श्रद्धांजलीची तऱ्हा.

१०. जिवन्त भुताची कथा

११. गाडयांचा ताफा गेला...

१२. ढवळी पवळी खिल्लारी जोडी

**पूर्व प्रसिद्धी :**

जत्रा मासिक ,महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता दिवाळी अंक, लोकसत्ता हास्यरंग पुरवणी, नगारा दिवाळी अंक, जनता टाइम्स दिवाळी अंक .जागृती दिवाळी अंक.

## ०१. अमरधाममधलं अजरामर सूत्रसंचालन ...

"**हालो**...कोण ? विमलताई का? मी महिपतराव बोलतोय..."

" हो.. मीच बोलत्येय.. "

"हां...मोब्या अशासाटी केला...की ...आत्ता सक्काळी सक्काळी  सायेब गेले. म्हंजी सरगवासी झाले! "

"आँ.. अग्गबाई !"

"हां.. त्यांचं फ्युनरल दुपारच्याला ठरलंय... त्याचा टेबल प्रोग्राम करायची डूटी माज्यावर आलीयं...तवा तुमच्या मदतीची गरज हाये.. म्हंजी सूत्तर संचालनाची...तवा तुमी यावा...घेयाला झेन मारोती पाटवतो.. जरा येळानं..."

" आँ ? अहो महिपतराव...कसं शक्य आहे हे...तिथं सूत्र संचालनाची खरंच गरजच नसते ... हो..."

" ह्ये बगा ताई .. आता .. तुमी नाई काई म्हनू नका...सायेबाला वाजत गाजत वाटी लावायचंय... तवा तुमचं आढंवेढं अजाबात चालायचं नाई. तुमच्याच नावाची आरडर आली हाय .. वरतून...आख्ख्या जिल्हयांतनं बडी बडी मंडळी येनार हायेत फ्युनरल  सेरेमनीसाटी ...तवा आता मान राखा समद्यांचा...तुमच्या बिदागीची जिम्मेदारी माज्याकडे लागली. बंद करतो  हां  मोब्या..."

" हॅलो... हॅलो...हॅलो..."

विमलताईंनी बंद झालेल्या मोबाईलकडे  हताशपणानं  बघीतलं आणि त्यांच्या डोळयांसमोर भर दिवसा काजवे चमकून गेले. गेल्या दहा वर्षांत त्यांच्या सूत्रसंचालनाचा बोलबाला संपूर्ण परिसरात झालेला होता. रटाळ कार्यक्रमही रसाळ करण्यात विमलताईंचा हातखंडा होता. साध्यासुध्या शब्दांच्या साह्यानं अफलातून कोटया करुन त्या बाजी मारुन जायच्या.  आगळे वकिलांच्या  'साठी' च्या समारंभात त्यांची बुद्धी 'नाठी' झालेली नाही, त्यांनी 'गाठी' ला काय काय बांधलं?त्यांच्या 'पाठी' 'पोटी' कोण कोण आहेत हे विमलताईंनी दिलखुलासपणे सूसंमध्ये गुंफलं आणि आगळे आडनावाला बगळे, कावळे, कोवळे,शहाळे,शेवाळे,सावळे असे सगळे 'ळे' जोडून कोटयांची आतिषबाजी सादर केली! असा कोटयांचा महोत्सव किंवा महावर्षाव लोकांच्या चांगलाच स्मरणात राहिला!

आतापर्यंत आपण सभा समारंभाच्या "तोरणदारी " सूत्रसंचालन केलं आज " मरणदारी " जाऊन आपलं कसब पणाला लावायला पाहिजे या निर्धारानं विमलताईंनी कंबर कसली. त्यांनी सूसंच्या नव्या जुन्या डायऱ्यांवरची धूळ झटकली. तुकारामाच्या " *आम्ही जातो आमुच्या गावा* " यासारखे अभंग आणि भा. रा. तांबे यांच्या "*मरणात खरोखर जग जगते* " "*जन पळभर म्हणतील हाय हाय*" इत्यादी कविता मनाशी घोकल्या आणि त्यांचा सूसंमध्ये कुठे कुठे चपखल वापर करायचा हे त्या ठरवू लागल्या.

झेन मारोती घेऊन महिपतराव आले. चालत्या गाडीत ते विमलताईंना कार्यक्रमाची रुपरेषा सांगू लागले :

"ह्ये पघा बडी बडी धेंडं भाषनं ठोकनार हायेत. परत्येक जन कोनच्या ठिकानी पदाधिकारी हायेत याची लिष्ट मी बनवली हाय.. ती ही घ्या...तुमी वजे वजे बैजवार ह्ये समदं वाचून दावायचं. ऐन टायमाला कोनाला डायरेक्ट श्रदांजली वावीशी वाटली तर त्याला बी बोलू देयाचं...आन सायेबाचं होल लाईप ,लाईपस्टाईल आन क्यारेक्टर कवर करत आधनं मधनं खुलवून सांगायचं. त्यांच्या लेकी सुना लेक  जावाई आनि गाववाल्यांना केवढं दुख झालं ह्ये समदं तुमाला ठाव हायेच. हां ही घ्या सायेबाची बायोग्रापी. ती चाळा आन शोकसभेमधी काय बी चावळा.. मी आता गप गुमान राहतो. चालू करा तुमचं वाचन... चिंतन... मनन..."

सुन्न झालेल्या विमलताई साहेबांच्या निवासस्थानी जाऊन पोचल्या. तिथलं वातावरण अतिशय गंभीर होतं. वयाची नव्वदी पार केलेल्या साहेबांचं पार्थीव मध्यभागी फुलांनी झाकलं होतं. अंत्यदर्शनाची रीघ लागली होती. शेजारच्या दालनात पत्रकार आणि चॅनलवाले एकेकाला गाठून बोलतं करत होते. विमलताईंनी तिथंच ठिय्या मारुन सूसंची पूर्वतयारी सुरु केली.

अंत्ययात्रा निघण्यापूर्वीच महिपतरावांनी विमलताईची रवानगी अमरधामकडे केली. तिथं टेबल , खुर्च्या, माईक आणि साउंड सिस्टीम पाहून विमलताई चक्रावून गेल्या. एरव्हीच्या कार्यक्रमांना अश्शी तयारी पाहिली की त्यांना कमालीचं स्फुरण चढायचं. सूत्र संचालक  म्हणून आपली जागा  त्या चोखंदळपणे ठरवायच्या. आज मात्र त्यांना गर्भगळीत झाल्यासारखं वाटू लागलं! त्यांची अवस्था महाभारतातल्या अर्जुनासारखी गलितगात्र झाली. *'आपुले मरण पाहिले म्या डोळा , तो जाहला सोहळा अनुपम्य '* या तुकोबाच्या अभंग ओळीवर त्या मनोमन पोचल्या !!

पण डगमगून जातील त्या विमलताई कसल्या? त्यांनी खरोखरच कंबर कसली आणि सूसंचा सगळा सोपस्कार यथास्थित पार पाडायला कसलेल्या सूत्रसंचालिका म्हणून त्या सिद्ध झाल्या. व्यासपीठावर कोण कुठं स्थानापन्न होणार याची माहिती त्यांनी काढून घेतली. तपशीलवार कार्यक्रम पत्रिका तयार केली. अमरधाममध्ये जमलेल्या लोकांमधनं संभाव्य वक्ते त्यांनी हेरले आणि सूसं विमलताई करणार हे हेरुन काहींनी आपला बोलण्याचा मनोदय त्यांच्याजवळ बोलून दाखवला! अशी पंचवीस तीस वक्त्यांची यादी झाली. अंत्ययात्रा पोचल्यावर त्यात आणखी पंधरा वीसची भर पडेल हे जाणवून विमलताई हबकून गेल्या!

एवढं सगळं होत असताना साहेबांची अंत्ययात्रा अमरधाममध्ये येऊन पोचली.

ढकलाढकलीतनं महिपतराव विमलताईजवळ आले. त्यांना क्रिकेटसारखी रनिंग कॉमेन्ट्री सुरु करायला सुचवू लागले पण साहेबांचे छोटे चिरंजीव रडत रडत धावून आले. त्यांनी विरोध दाखवला आणि विमलताईंची 'धावत्या समालोचनाच्या धर्मसंकटा' तनं सुटका झाली.

इकडे व्यासपीठावर मांडलेल्या खुर्च्यांवर भलतीच बडी आणि स्वयंघोषित मंडळी स्थानापन्न झाली होती. त्यांना बघून महिपतराव चक्रावून गेले! त्यांनी विमलताईंच्या हातात दिलेल्या यादीचा आणि आसनस्थ मंडळींचा मेळ बसेनासा झाला. तेव्हा महिपतराव विमलताईना  कानांत म्हणाले

"आता काय बी करा... आन हाना कसंबी सूतर संचालन .. !"

प्रसंगावधान राखून विमलताईंनी धीर गंभीर आवाजात सूसं सुरु केलं. साहेबांचं नव्वद वर्षांचं कृतार्थ जीवन लोकांसमोर उभं केलं. अभंग,सुभाषितं,सुवचनं यांनी सूसं सजवायला सुरवात केली. तेवढयात "आता पब्लिकला बोलू द्या " अशा सूचना हलक्या आवाजात यायला लागल्या.

विमलताईंनी महिपतरावाच्या यादीनुसार एकेका पदाधिकाऱ्याचं नाव पुकारायला सुरवात केली. अमरधामच्या कोनाकोपऱ्यातनं, कुठून कुठून एकेक जण येऊन साहेबांना श्रद्धांजली वाहू लागला. विमलताईंना हायसं वाटलं. साहेबांविषयी समाजात केवढा आदरभाव आहे याची त्यांना कल्पना आली. अमरधाममधलं आपलं आजचं सूत्र संचालन लोकमानसात अजरामर होणार असं त्यांना वाटू लागलं.

निम्मी अधिक भाषणं पुरी होत असताना विमलताईंच्या हातामध्ये इकडून तिकडून चिठ्ठया येऊ लागल्या. अशा आलेल्या पाच सहा चिठ्ठया न वाचताच त्यांनी पर्समध्ये कोंबल्या. अशा चिठ्ठया सूसं आवडल्याच्या असतात, असा त्यांचा पूर्वानुभव होता!

शेवटी गीतेच्या पंधराव्या अध्यायाच्या पठनानंतर "साहेबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वांनी पाच मिनिटं स्तब्धता पाळावी "अशी अध्यक्षांनी सूचना करुन आपल्या हातातलं मनगटी घडयाळ काढून स्वताच्या डोळयांसमोर धरलं. दोन मिनिटांनंतर थोडी फार चुळबुळ सुरु झाली तरी अध्यक्षांनी पाच मिनिटं पुरी होईपर्यन्त आपली "ध्यानावस्था" सोडली नाही! त्यामुळे पब्लीकचा नाइलाज झाला!!

झेन मारोतीत बसून विमलताई आपल्या घरी पोचल्या. यथावकाश पर्समध्ये कोंबलेल्या चिठ्ठया काढून वाचायला सुरवात केली आणि पुन्हा एकदा त्यांच्या डोळयांसमोर भर दिवसा काजवे चमकू लागले!

पहिल्या चिठ्ठीत लिहिलं होतं, "माला सायेबाच्या विलेक्शनमदील भ्रष्टाचाराबदल बोलाचं हाये. परमिशन द्या "

दुसरी चिठ्ठी म्हणत होती, "सग्या सोयऱ्याचं भलं करन्याशिवाय साह्येबांनी काय क्येलं? क्रुपया खुलासा करावा . "

तिसरी चिठ्ठी क्म्हत होती ,"धुतल्या तांदुळावानी कोन? तुमी आमी की साहेब ?"

एकेक चिठ्ठी वाचता वाचता सूत्र संचालिका विमलताईंनी डोक्यावर हात मारुन घेतला !!

ooooo

**(लोकसत्ता हास्यरंग पुरवणी डिसेंबर २००८)**

## ०२. आलीया भोगासी असावे सादर

**त्र्यं**बकेश्वर जवळ आल्याच्या खुणा दिसू लागलाच बजरंगरावांना आनन्दाचं भरतं आलं. या तीर्थक्षेत्राला त्यांनी अनेकदा भेट दिली असली तरी प्रत्येक वेळी त्यांना होणारं समाधान अपूर्व असायचं. पाच वर्षापूर्वी ते वन विभागाच्या नोकरीतनं निवृत्त झाले. एका अर्थानं एकान्तातनं लोकान्तात आले. घरातल्या जबाबदाऱ्या मुलांवर सोपवून ते नातलगांकडे वर्षश्राद्ध, लग्नकार्य, साखरपुडे अशा निमित्तानं हजेरी लावू लागले. वयोमानुसार त्यांच्या हालचाली मंदावल्या असल्या तरी त्यांचा उत्साह अचंबित करायचा. गावजेवणासारख्या कार्यक्रमात पंगतीच्या पंगती वाढण्याची त्यांना हौस होती. लग्नकार्यात बॅण्ड वाजंत्रीच्या ठेक्यावर ते देहभान विसरून नाचायचे. कोणत्याही सार्वजनिक कामात स्वतःला झोकून देण्यात त्यांचा हातखंडा होता.

बजरंगराव आज त्र्यम्बकेश्वरला अशाच एका लग्नासाठी आले होते. त्यांच्यासोबत त्यांचा भाचा सदाशिव होता. लग्न संध्याकाळचं असलं तरी हे दोघं सकाळीच येऊन पोचले. त्यांनी लग्नघरी जाऊन आगमनाची वर्दी दिली. दोघांना फराळ करण्याचा आग्रह झाला तेव्हा बजरंगराव म्हणाले,

“अहो, एवढा तीर्थक्षेत्री आलो आहे तेव्हा अनाशेपोटी त्र्यम्बकराजाचं, निवृत्तीनाथाचं दर्शन उरकतो अन् मग येतोच की ताव मारायला...”

ते सदाशिवाला सोबत घेऊन बाहेर पडले. त्याला सोबतीच्या मुलांसह मांडवात धुमाकुळ घालायचा होता. पण मामांनी त्याचं बखोट पकडून आपल्या सोबत घेतलं. तोही अनाशे पोटी लग्नघरातनं बाहेर पडला.

त्र्यम्बकेश्वराच्या मंदिरासमोर भली मोठी रांग लागलेली त्यांनी पाहिली. तिच्यात उभं राहिलं तर दुपारचे दोन वाजणार अन् सदा आणखीनच भुकेजला होईल याचा अंदाज बजरंगरावांना आला. त्यांनी मंदिराच्या कळसाचं दर्शन घेण्यातच समाधान मानलं.

तिथनं ते सदासह कुशावर्ततीर्थावर जाऊन पोचले. सदाला पिशव्या राखायला बसवून त्यांनी पुनश्च सचैल स्नान केलं. भिजलेला नाडीचा ऐसपैस लंगोट, बंडी, धोतर आदी कपडे त्यांनी काठावर आडवेतिडवे वाळत घातले. ते वाळेपावेतो तिथं नुसतंच बसून राहण्यापेक्षा जवळच असलेल्या विठोबारायाच्या देवळात जाऊन यायचं त्यांनी ठरवलं. पंढरपुरी गेल्यावर भिवरेच्या तिरी कपडे वाळत घालून नगरप्रदक्षिणा करण्याची त्यांची सवय होती. आपले कपडे, सामानसुमान श्रीहरी 'जातीनं' राखतो अशी त्यांची श्रद्धा होती. मामा आपले कपडे असे बेवारस सोडून इतरत्र कसे जाऊ शकतात, याचं सदाच्या बालमनाला कोडं पडलं.

सकाळचे दहा वाजले तरी विठोबारायाच्या देवळात शुकशुकाट होता. एखाद दुसरा भाविक यायचा. दुरनंच दर्शन घेऊन माघारी फिरायचा. एका भाविकानं विठोबारायाच्या गाभाऱ्याबाहेर प्रदक्षिणा घालण्यात स्वताला गुंतवून घेतलं होतं. दुसरा पहारेकरी भाविक गाभाऱ्यात उभं राहून अखंड वीणा वादन करण्यात मग्न होता.

बजरंगरावांनी प्रसन्न चित्तानं घण्टानाद करत देवळात प्रवेश केला. मुखानं हरीपाठाचे अभंग गुणगुणत विठोबारायाच्या साजिऱ्या मूर्तीचं डोळे भरून दर्शन घेतलं. तिला पाठ न दाखवता ते गाभाऱ्यातनं बाहेर पडताना वीणा वाादन करणाऱ्या पहारेकऱ्याला त्यांचा धक्का लागला. त्यांनी लगेच लीन होऊन क्षमा याचना केली. पहारेकऱ्यानं त्रासिक नजरेतनं कटाक्ष टाकत थंडा प्रतिसाद दिला.

बजरंगराव प्रदक्षिणा मार्गाला लागले. दहा प्रदक्षिणा पुऱ्या झाल्यावर अकरावी प्रदक्षिणा घालून लग्नघरी परतायचं त्यांनी ठरवलं. त्याच्या पाठोपाठ फिरणारा सदाशिव चांगलाच भुकेला झाला होता. मामांचं भराभर चालणं अन् सदाचं त्यांच्यामागे धावणं असा शिवाशिवीचा खेळ चांगलाच रंगला. लग्नघरी हुंदडण्याचा मोह टाळल्याची त्याच्या मनाची रूखरूख कमी झाली. त्र्यम्बकेश्वराच्या मंदिरासमोरची भली मोठी गर्दी, कुशावर्त तीर्थावरची आंघोळीची लगबग अन् आता मारूतीरायाच्या देवळातला एकान्त अनुभवून त्याला बरंच वाटलं होतं. आता आपल्याला परत लग्नघरी जायला मिळणार अन् खायला व पुन्हा हुंदडायला मिळणार याच आनन्दात तो होता.

'देवचिये दारी उभा क्षणभरी, तेणे मुक्ती चारी साधियेल्या' असं पुटपुटत बजरंगराव चपला स्टॅण्डकडे निघाले. तेवढयात सभा मंडपातनं आवाज आला,

"म्हाराज ,आत या की जरा.. "

बजरंगरावांचं लक्ष अखंड वीणावादन करणाऱ्या पहारेकऱ्यानं वेधलं.

"काय म्हणताय माऊली ?" बजरंगरावांनी आस्थापूर्वक विचारत गाभाऱ्यात पुन्हा प्रवेश केला. तिथं हवा खेळायला अजिबात जागा नव्हती. छताला टांगलेली एकुलती एक मरक्युरी मरतुकडा उजेड पाडत होती.

"जरा घ्या की ही इना.. प्हाटी पाच वाजल्यापासनं गळयात हाय माज्या...आट वाजेला सोडायला जोडीदार येनार होता तो काई आजून आला नाई.. आकरा वाजलं आसतील ना.. "

"हो...हो... द्या की ती वीणा...आज आमच्या हातनं विठोबारायाची सेवा घडण्याचा योग दिसतोय...द्या. द्या . सावकाश जाऊन या..."बजरंगरावांना उत्साहाचं भरतं आलं. आपले मामा गळयात वीणा धारण करून कसे आगळे वेगळे दिसताहेत याचं सदाला कुतूहल वाटू लागलं.

"कोपऱ्यावरच्या हाटलीत च्या पानी करतो आन् लागलीच येतो बघा. "बोलता बोलता पहारेकऱ्याचं लक्ष सदाशिवाकडे गेलं.

"तू येतो का रं माझ्यासंगं. "

"नको.. नको.. आम्हाला लग्नघरी लागलीच निघायचंय.. फक्त त्याच्यासाठी शेवपापडी घेऊन या. हे घ्या पैशे.."

बजरंगरावांनी दिलेली वीसाची नोट घेऊन पहारेकऱ्यानं पडत्या फळाची आज्ञा मानून धूम ठोकली.

वीणा हातात घेताच बजरंगरावांना गाथेतले अनेक अभंग एका पाठोपाठ आठवू लागले. अखंड सप्ताहात केवळ वीणा वादन अभिप्रेत असलं तरी बजरंगराव एकेक अभंग गुणगुणू लागले. 'जे का रंजले गांजले' ही अभंगाची ओळ सदाशिवाला 'जे कारंजे गंजले' अशी ऐकू आली. तरीही तो एका ठिकाणी निमूटपणानं बसून पहारेकऱ्याची अन् शेवपापडीच्या पुडयाची वाट पाहू लागला. सभामंडपातल्या सगळया खांबांना आलटून पालटून शिवण्याचा त्याचा खेळ सुरू झाला.

बारा वाजून गेले तरी पहारेकरी येण्याची चिन्हं दिसत नव्हती...सदाशिवाच्या पोटात भुकेनं कावळे कोकलू लागले. बजरंगरावांच्या पाठान्तराचा साठा संपत आला. जांभई आवरून ते मुकाटयानं वीणा वादन करत राहिले. वयोमानानुसार पाय दुखू लागल्यानं खाली बसण्याची इच्छा प्रबळ झाली पण पहारेकऱ्यानं पहारा देताना असं खाली बसायचं नसतं, वीणा बंद करून खाली ठेवायची नसते हे नियम त्यांना अवगत होते. वीणेच्या तारांवरनं सराईतपणे फिरणारी त्यांची बोटं अधनंमधनं चांगलीच थरथरू लागली. एखाद दुसरा दर्शनार्थी देवळात येत होता. लगेच जात होता.

एकच्या सुमाराला सात आठ बायकांचा घोळका दर्शनासाठी आला. मिळून सगळयाजणींनी जाताना बजरंगरावांनाही वाकून नमस्कार केला. खाली वाकलेल्या महिलांना त्यांची चुळबुळ दिसणं शक्यच नव्हतं. त्यांच्यापैकी कुणालाही वीणा देऊन स्वताची सुटका करून घेणं बजरंगरावांना प्रशस्त वाटलं नाही तरीही बजरंगराव घोळक्यातनं मागे राहिलेल्या महिलेला हलक्या आवाजात म्हणाले,

“ताई.. बाहेर कोणी पहाऱ्याला तयार असंल तर त्याला आत पाठवता का जरा. ”

ती महिला मान डोलावून बाहेर पडून दिसेनाशी झाली. अर्ध्या तासानं वारकरी वेशातली एक व्यक्ती आपल्याकडे येताना बजरंगरावांना दिसली. त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या.

“पाया लागू म्हाराज.. कोण गावचं तुमी? त्या बाईनं निरोप पोचवला तुमचा म्हनून आता कामधंद्याच्या टायमाला आत आलोय. ”

“पाया लागू म्हाराज.. मी श्रीरामपुराहून आलोय.. आपण?

“ मी या देवस्थानचा चेरमन आहे.. नरहरीबुवा म्हनतात माला. देवळाभायेर गुलाल बुक्क्याचं दुकान आहे आपलं. पहिला पहारेकरी क्वापासनं गायब झाला?”

“अकरा वाजता. आता दीड वाजत आला तरी पत्ताच नाही त्याचा.. ” बजरंगराव त्रासिक तक्रारीच्या सुरात उद्‌गारले. नरहरीबुवा देवस्थानचे चेअरमनच असल्यानं ते वीणा खांद्यावर घेऊन आपली सुटका करतील असं त्यांना वाटू लागलं. पण त्यांनी बाह्या सावरत बजरंगरावांचीच उलट तपासणी सुरू केली.

“कोन होता तो हराममखोर .... तुमच्यासारक्या देवमानसाला लटकवून गावभर हिंडायला गेला तो? आँ ?”

“ त्याचं नाव काही माहित नाही बुवा...”

“नक्कीच.. नारोबाच आसनार तो... त्यालाच ही लत आहे...महिन्या दोन महिन्यातनं तो आसाच वागतो.. तुमी चालू द्या वीना.. आता त्याला शोधून आनतो तुमच्यासमोर.. मग असा झाडतो की बगतच राल तुमी.. ”

धोतराचा सोगा सावरत नरहरीबुवा तरातरा बाहेर पडून दिसेनासे झाले.

जडशीळ बोटांनी बजरंगराव पुन्हा वीणा वादन करू लागले. “आता कोठे धावे मन.. तुझे चरण देखलिया .... ” ही अभंगाची ओळ ते आर्त स्वरात गुणगुणू लागले!

अडीच वाजण्याच्या सुमाराला बजरंगरावांना दोन व्यक्ती देवळात शिरताना दिसल्या. नरहरीबुवांच्या शिव्यांचा पट्टा चालू होता. नारोबा नामक पहारेकरी खाल मानेनं निमूटपणानं बजरंगरावासमोर येऊन उभा ठाकला!

“कोठे गेला होतात माऊली... इतका वेळ...” बजरंगराव बोलण्यातलं मार्दव जपत विचारु लागले. देवाच्या दारी उगाच त्रागा दाखवण्यापेक्षा समजुतदारपणा ठेवण्यात हंशील आहे, असं त्यांना वाटलं. दुसरीकडे अखंड नाम सप्ताहात आपल्याला दोन अडीच तास अनाशा पोटी पहारा देण्याचं पुण्य गाठीला बांधता आलं याचं आंतरीक समाधान त्यांच्या मनात दाटून आलं.

“म्हाराज .. देवाच्या पुढं खोटं नाई बोलत... जुलाब... लई जुलाब झाले माला... ह्ये बगा.. धोत्राचा सोगा कसा पान्यानं गच्च भिजलाय...माला वाटलं जोडीदार आलाच असंल.. बारा वाजेला त्यानं तुमच्यासारक्या देवमानसाची सुटका केलीच आसंल...”

“ डामरटा.. बास झाले तुजे बहाने.. म्हाराजांच्या पाया पड आन घे ती वीना गळयात चटदिशी...”

नरहरीबुवा नारोबाला बखोटीला धरून बजरंगरावांच्या पायांशी ढकलत म्हणाले.

नारोबांनी वीणेचा भार खांद्यावर घेताच बजरंगरावांनी सुटकेचा सुस्कारा सोडला. बैलाच्या मानेवरचं जू बाजूला होताच त्याला जसं वाटतं तसा भूतदयावादी अनुभव बजरंगरावांना आला. त्यांनी सभामंडपात जाऊन एका खांबाला टेकून बसकण मारली. इतका वेळ बसून बसून कंटाळलेला सदाशिव आता आपल्याला जायला मिळणार या आनंदात उठून उभा राहिला.

बाहेर गेलेले नरहरीबुवा पंधरा वीस मिनिटांनी लगबगीनं आत आले. त्यांच्या हातात ताट होतं. त्यात शाल, हार, नारळ, बुक्क्याची पुडी आणि शेवपापडीचा पुडा होता. त्यांनी बजरंगरावांच्या कपाळी बुक्का फासत गळयात हार घातला अन् खांद्यावरनं शाल पांघरत हातात प्रसादाचा नारळ दिला. भुकेनं व्याकुळ झालेला सदाशिव आशाळभूतपणानं शेवपापडीच्या पुडयाकडे पाहत होता. त्याला देताना ते पुटपुटले,

"लेकरू लईच टांगलं गेलं.. त्या हरामखोरापाई "

बजरंगरावांकडे वळत ते म्हणाले,

"म्हाराज.. आपली माफी मागतो...मी. देवस्थानच्या पंच कमेटीकडनं आपल्यासारक्या देवमानसाचा सत्कार करायला मिळाला आमाला.. हे बी आमचं भाग्यच म्हटलं पाईजेल आहे. चाला भायेर चाहा पानी घेऊ आपन . "

बजरंगरावांनी चहापाण्याला नकार देऊन देवळातनं काढता पाय घेतला. भुकेनं व्याकुळ झालेल्या सदाची पावलं जडशीळ पडत होती.

ते लग्नघराच्या वाटेला लागले तेव्हा दुपारचे पावणे चार वाजले होते. लग्नाचा मांडव दिसू लागला तेव्हा सदाशिव काहीतरी आठवून एकदम किंचाळला,

"मामा...आपले कपडे तिकडंच राहिले. कुशावरतावर!"

बजरंगरावांच्या डोळयांसमोरनं भर दुपारी तारे चमकू लागले!

**ooooo** **(जत्रा मासिक ,मे २०१३ )**

## ०३ भव्य दिव्य अवाढव्य ...

**सं**पतराव वयाची ७४ वर्षं पूर्ण करुन पंच्यात्तराव्या वर्षात जातील याची पहिली चाहूल सर्जेरावांना लागली. या घटनेला 'आमरुत मोहोत्सव ' म्हणतात, हे देखील त्यांना ठाऊक होतं. मोठमोठया पुढाऱ्यांचे असले सोहळे त्यांनी अनुभवलेले होते. तेव्हा त्यांनी संपतरावांचे सुपुत्र हणमंतरावांजवळ हा विषय काढायचा घाट घातला. पाच पंचवीस कार्यकर्त्यांसह ते फॉर्महाऊसमधल्या बंगल्यावर पोचले. हणमंतरावांना आपल्या पिताजींच्या भूतकाळापेक्षा आपल्या भवितव्याची,येत्या निवडणुकीत तिकीट मिळण्याची चिंता भेडसावत होती. या निमित्तानं आपलं राजकीय पुनर्वसन होईल अशी अटकळ बांधून ते सर्जेरावांचं बोलणं मनापासनं ऐकू लागले. सर्जेराव म्हणाले,

" अवो, संपतरावांच्या महान कारयाची दखल आपन नाही घ्यायची तर कोनी घ्यायाची.. ते काही नाही .. आपल्याला संपतरावांचा आमरुत मोहोत्सव थाटामाटात आन् धूमधडाक्यानं साजरा करायचाच बघा.... पैशांची काही चिंता नाही.... तो उभा राहील...हा हा म्हनता जमा व्हईल...समित्या बिमित्या थापन करण्याची जिम्मेदारी माझी.. तुमी पावन्यारावळयांचं बघा...या निमिंत्तानं पालक मंत्र्यांपासनं थेट मुख्यमंत्र्यांपरयंत सगळे गावात येतील आन् आपल्या ईकासाचे प्रश्न मारगी लागतील संपतरावांचं कारय हिमालयायेवढं थोर तवा म्हाराष्ट्रातले तमाम सह्याद्री आापसूक जमतील बघा.. "

हे ऐकून हणमंतरावांचे डोळे एकदम लकाकले. त्यांनी मनाशी सगळे हिशोब मांडले. सोहळयासाठी होणाऱ्या खर्चापेक्षा आपली जमा बाजू भक्कम होईल असा ठोकताळा बांधत ते म्हणाले ,

"हेच आमच्या मनात चाललं होतं कधीचं ...पन मी पुढाकार घेनं बरं दिसनार नाही...अण्णांना आता उठता बसता बी येत नाही...त्यांना मी तयार करतो. या कार्यकरमाला लागनारा पईसा पहिले आपल्या साकर कारखान्यातनं आन् शाळेकडनं गोळा करावा लागंल...लोक देतील.... अण्णाचं कारय हायेच तेवढं.. माज्यापासनंच सुरवात करतो.... पयल्या हातखरचासाठी मी पाच लाख देतो आन् समारंबात पाच लाखाची देनगी जाहीर करतो.... चालंल ना मंडळी ? पन् सगळं कसं बेतशीर भव्य दिव्य आन अवाढव्य झालं पायजेल आहे. "

हणमंतरावाचं बोलणं ऐकून सर्जेरावासह सगळया कार्यकर्त्यांना स्फुरण चढलं...उत्साहाचं भरतं आलं.

* *

अलिकडे संपतरावांची तब्येत तशी नरम गरमच होती. वयोमानानुसार त्यांना उठता बसता येत नव्हतं...चालणं फिरणंही कमी झालं होतं...आता आपल्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात द्यायचं भाषण कसं लिहिता आणि बोलता येईल ... याचाच घोर त्यांना लागून राहिला. गावातले रिटायर्ड हेडमास्तर जोशीगुरुजी त्यांचे स्नेही होते...त्यांच्याकडनंच 'भाशन लिहून घ्यायचं आणि त.. त.. फ.. फ.. झालं तरी सभेत सादर करायचं असं संपतरावांनी ठरवलं. सत्कार समितीतर्फे दोन प्राध्यापक येऊन त्यांची मुलाखत घेऊन गेले. फोटोबिटो काढले गेले...त्या दिवशी दुपारभर संपत रावांना कलंडायला मिळालंच नाही...

एके दिवशी रात्री झोप लागत नाही म्हणून ते हणमंतरावांच्या टेबलापाशी कसेबसे गेले. तिथं त्यांना मानपत्राचा आराखडा वाचायला मिळाला. तो वाचून त्यांची छाती दोन इंच फुगली. शाळा , भजनी मंडळ , गणेशोत्सव समिती , पतसंस्था, दूध उत्पादक संघ , कामगार युनियन, मार्केट कमेटी. जिल्हा बँक इत्यादी अनेकानेक संस्थांमध्ये संपतरावांनी केलेल्या कार्याची पोचपावती त्यात लिहिलेली होती. त्यामध्ये त्यांनी भूषविलेल्या सटर फटर पदांचाही लेखाजोखा होता. तो वाचताना संपतरावांचं मन खट्टू झालं. सगळया ठिकाणी 'माजी'हा शब्द ठसठशितपणे लिहिलेला होता. तो तेवढा काढून फक्त 'मा. ' ठेवा म्हनजे लोक माननीय मानतील, असं संबंधित मराठीच्या प्राध्यापकाला सुचवायचं , असं घोकत त्यांना झोप केव्हा लागली हे समजलंच नाही....

* *

इकडे सर्जेरावाची लगीनघाई सुरु झाली. कार्यक्रम भव्य दिव्य आणि अवाढव्य करायचाच असा चंगच त्यांनी बांधला. हणमंतरावांनी त्यांच्या दिमतीला मारुती व्हॅनसह कार्यकर्त्यांची फौज दिली होती. निमंत्रण पत्रिकांपासनं सुरवात झाली. उद्घाटक, अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, सूत्रसंचालक, मानपत्र वाचक, आभार प्रदर्शक, गायक वादक इत्यादींच्या नामावलीसह जम्बो पत्रिकेचा एक भाग पूर्ण व्यापला. दुसऱ्या पानावर संपतरावांचे सगळे सगेसोयरे त्यांच्या पदांसह आणि लेकी , मुलं ,सुनांसह नातवांची नामावली विराजमान झाली. तिसऱ्या पानावर सत्कार आणि स्वागत समितीचे सर्व पदाधिकारी आठवून आठवून कोंबण्यात आले. चौथ्या पानावर संपतरावांचा जीवनपट त्यांच्या आजी माजी पदांसह छापण्यात आला. एवढं होऊनही '*आमच्या आजोबांच्या अमृत सोहळयाला यायचं हं ३ किलबिल परिवार* 'ही ओळ टाकायचीं राहून गेली,याची सर्जेरावांना रुखरुख वाटू लागली. 'ते बरं दिसणार नाही'असं म्हणून मराठीच्या प्राध्यापकांनी त्यांची कशीबशी समजूत घातली. त्यांच्याकडे स्मरणिका संपादनाचं काम सोपविण्यात आलं होतं. सगळया जिल्हा वृत्तपत्रांच्या पुरवणी संकलनासाठी स्थानिक पत्रकारांची धावपळ सुरु झाली. सर्जेरावांनी कोट टायसह आपले बरेच फोटो काढून घेतले. कार्यक्रमासाठी लॉन असलेलं मंगल कार्यालयच हणमंतरावांनी बुक केलं . तिथं आलिशान मंडप उभारण्यात आला. हजार माणसांच्या मिष्टान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली. 'भोजन भाऊ एकत्र आले म्हणजे हुपस्थितीची चिंता राहात नाही' असं समिती प्रमुख महिपतरावांनी नुसतं सुचवलं आणि हणमंतरावांनी थैलीचं तोंड आणखी सैल केलं....

पुण्याहून खास सनईवादक, तुतारीवादक, सूत्रसंचालक आणि संस्कार भारतीची रांगोळी भराभर आणि भाराभार काढणारे कलावंत आणण्याचं ठरलं. सगळयांच्या भरघोस मानधनाला सत्कार समितीनं निमूटपणे मान्यता दिली...वाढदिवसाच्या दिवशी संपतरावांना ७५ सुवासिनींनी ओवाळायचं ठरलं. त्याप्रमाणे तजवीज करण्यात आली. ही संख्या काही केल्या पुरी होईना. त्यामुळे गावातल्या कॉलेजमधल्या जाडजूड कुमारिकांना संधी देण्याचं ठरविण्यात आलं. ही जबाबदारी सर्जेरावांच्या बायकोन आनंदानं घेतली. ७५ बैलजोडया लावलेल्या गाडीतनं संपतरावांची मिरवणूक काढण्याची योजना मात्र बारगळली. कारण एवढया बैलजोडयाच काय ट्रॅक्टरसुद्धा मिळणं मुश्किल होतं..

आता मिनिट टू मिनिट कार्यक्रम पत्रिका आणि सगळयांच्या कायम स्मरणात राहतील अशी स्मृतिचिन्हं तयार करणं...एवढी दोनच कामं उरली ,असं घोकत सर्जेरावांनी उसासा टाकला. तेवढयात त्यांना संपतरावांना सत्कार समितीच्या वतीनं घालायच्या " महाहारा " ची आठवण झाली. तो तीनरंगी फुलांचा आणि आपादमस्तक, पायघोळ असला पाहिजे असा अनुयायांनी आग्रह धरला तेव्हा संपतरावांच्या तोळामासा अंगकाठीचा सगळयांनाच विसर पडला. त्यांनी लगेच शिर्डीला मोबाईल केला.

स्मृतिचिन्ह कसं आणि केवढं असावं या विचारानं सर्जेरावांना चांगलंच पछाडलं. शेवटी त्यांच्या मदतीला गावातले ड्रांईंग टीचर धावून आले. दोघांनी अक्कलहुशारीनं त्याचं डिझाईन ठरवलं. ग्रामीण संस्कृतीचं प्रतीक म्हणून खरोखरचा एक हंडा त्याच्यावर छोटी कळशी अन् हंडयावर संपतरावांच्या मानपत्राचा तर्जुमा आणि कळशीवर सत्कार समितीचे पदाधिकारी तसेच सर्व विशेष पाहुण्यांची नावं काळया रंगात रंगवण्याचं ठरलं. अतिविशिष्ट पाहुण्यांना अशी अगडबंब २५ महा स्मृतिचिन्हं देण्याचं ठरलं मध्यम दर्जाच्या पाहुण्यांसाठी हंडा कळशीऐवजी लोटी भांडयाची योजना करण्यात आली. त्यांची संख्या काटछाट करुन ५० वर जाऊन ठेपली. ती देखील जडबदक झाली पाहिजे अशी तंबी सर्जेरावांनी भरली. फारच सुमार आणि किरकोळ पाहुण्यांसाठी हंडा कळशीचाच चार रंगात छापलेला फोटो डायरेक्ट एम्बॉस करण्याचा निर्णय झाला. अशी हलकीफुलकी १०० स्मृतिचिन्हं तयार करण्याची ऑर्डर जिल्हयाच्या ठिकाणी देण्यात आली. सगळयांसाठी काचेचे आयाताकृती बॉक्स असावेत असा आग्रह हणमंतरावांनी धरला. त्यामुळे सर्व स्मृतिचिन्हांचं एकत्रित आकारमान वाढलं. एका खास टेम्पोमधनं ती आदल्या दिवशी येऊन पोचली तेव्हा व्यासपीठाचा मागील अर्धा भाग भरुन गेला. हे पाहून सर्जेरावांची छाती अभिमानानं भरुन आली, उद्याचा कार्यक्रम खराखुरा भव्य, दिव्य अन् अवाढव्य होणार याची खात्री पटून ते सुखानं झोपी गेले.

* *

अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या सोहळयाचा दिवस उजाडला. मिनिट टू मिनिट कार्यक्रम पत्रिकांच्या प्रती सांभाळत सर्जेरावांची लगबग चालू होती...कानाला मोबाईल लावून ते इकडून तिकडे फिरत होते. हणमंतरावांनी धूर्तपणे आपलाही मोबाईल त्यांच्या कब्ज्यात दिला होता. त्यामुळे 'कभी हा .. कभी ना ,,कभी वो.. कभी ठो...' असं त्यांचं एकसारखं चाललं होतं. संपतरावांना अकरा ट्रॅक्टरांना जोडलेल्या एका ट्रॉलीत बसवून मिरवणुकीनं सभास्थानी आणण्यात आलं. त्यांना ओवाळणारा सुवासिनींचा ताफा जय्यत तयार होता. ऐन कार्यक्रमात औक्षण करण्याची मूळ कल्पना होती पण सगळे पाहुणे जमण्यात दोन तास उलटून गेले. शेवटी नटलेल्या ,सजलेल्या सगळया सुवासिनींना ताटकळत ठेवण्यापेक्षा औक्षण उरकून घेण्याचं ठरलं. तो पर्यन्त संपतरावांची बसल्या बसल्या हलकीशी डुलकी झालेली होती. ते ताजेतवाने झाले आणि औक्षण आटोपल्यामुळे सभास्थानातली महिलांची संख्या बऱ्यापैकी स्थिरस्थावर झाली. सनई वादकांचे गाल सगळे राग गाऊन धकून गेले. स्वागतासाठी उभी केलेली शाळेतली मुलंमुली कोमेजून गेल्या . संस्कार भारतीच्या सुंदर रांगोळया पायदळी तुडविल्या गेल्यानं वेडया वाकडया झाल्या. सूत्रसंचालक ,स्वागत गीत गाणाऱ्या गायिकांना जांभया येऊ लागल्या...फोनाफोनी चालू होती. दोन तासांनी सगळे पाहुणे जमल्याची खात्री पटल्यावर कार्य क्रमाला रीतसर सुरुवात झाली.. स्वागतगीतापासनंच 'आटोपतं घ्या' 'लवकर आवरा' 'शॉर्ट बट स्वीट' अशा सूचना 'सन्माननीय व्यासपीठा' वरनं हलक्या आवाजात येऊ लागल्या. तरीही प्रत्येक वक्ता इमानेइतबारे 'सन्माननीय व्यासपीठ' म्हणून पुन्हा लगेच सर्व बारीक सारीक पाहुण्यांना त्यांच्या पदांसह संबोधू लागला...मानपत्राचं वाचन मराठीच्या प्राध्यापकानं अस्खलितपणे केलं. मानपत्र घेण्यासाठी संपतरावांना अदृश्य टेकू लावून उभं करण्यात आलं . त्याची अवजड फ्रेम तोलता तोलता संपतरावांसमोर तारे चमकून गेले. कारण भर दुपारच्या उन्हाची तिरीप मानपत्राच्या काचेवरच पडत होती. त्यांच्या गळयात घाईघाईनं तिरंगा महाहार घालण्यात आला तेव्हा ते कोसळतात की काय ...अशी अवस्था निर्माण झाली पण पालकमंत्र्यांनी त्यांचं पालकत्व घेऊन त्यांना प्रसंगावधान राखून सावरुन घेतलं. महाहाराच्या दुपटयात किंवा दुपट्टयात संपतराव दिसेनासे झाले. त्यामुळे फोटोग्राफरांची धांदल उडाली . सत्कार समितीनं खास तयार केलेलं महा स्मृतिचिन्ह स्वीकारण्याची संपतरावांना हिम्मतच झाली नाही...आपलं सगळं आतापर्यन्तचं जीवनकार्य

केवढं जड आहे याची त्यांना प्रचिती येऊन गेली होती. महा हंडा आणि महा कळशी असलेलं अगडबंब महा स्मृतिचिन्ह त्यांना दूरुनच दाखवण्यात आलं. ही सुज्ञपणाची सूचना पंचायतसमितीच्या उपाध्यक्षांनीच केली. त्यांच्या अंगाखांद्यावर उंची शाल घालण्यात आली. ती मात्र न काढता थकले भागले संपतराव पुढची भाषणं मिटी मिटी ऐकू लागले. तुतारीच्या आवाजाच्या दणक्यानं अधनंमधनं चांगलेच दचकू लागले.

इकडे प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराचा सोहळा सुरू झाला. प्रत्येकजण अगडबंब स्मृतिचिन्ह घेताना कमालीचा अवघडून गेला.... शाल सांभाळावी तर मान गळयातल्या सेमी महाहारात जखडलेली...पुष्पगुच्छ घ्यायचा तर कोणालाच एक्स्ट्रा हात नाही .. तिकडे सूत्रसंचालक आपल्या विषयी चार चांगले शब्द बोलतो आहे तर ते ऐकायला चित्त थाऱ्यावर नाही अशी बहुतेकांची अवस्था झाली...पाहता पाहता पाहुण्यांसमोरचं टेबल पार भरुन आणि भेदरुन गेलं. फोटोग्राफर त्यांना लगोलग पायउतार करु लागले. व्यासपीठाची मागील बाजू मोकळी झाल्यावर संयोजकांना हायसं वाटू लागलं. स्वताचं हक्काचं महा स्मृतिचिन्ह घेतल्यावर सर्जेरावांनी व्यासपीठामागे जाऊन करकचून आळस दिला आणि बिडी शिलगावली.

एकेक वक्ता संपतरावांचं मुक्तकंठानं गुणगान करु लागला. ज्यांना श्रीफळं, शाली ,हारतुरे आणि महा स्मृतिचिन्हं मिळाली होती ते सगळं 'सन्माननीय व्यासपीठ' आगळयाच विवंचनेत गढून गेलं.... शालींचं ठीक पण नाव टाकलेलं महा स्मृतिचिन्ह न्यायचं कसं ...हारतुरे श्रीफळांसारखं ते इथेच ठेवून जाणं शोभणार नाही.. या विचारानं जो तो बेजार झाला... काचेतले हंडे अन् कळशा एकमेकांना खेटूनही आवाज न करता मुकाट होती. आपल्याला कोण नेतो ...कोण नाही... याची वाट पाहू लागले.

काहीजणांनी व्यासपीठावर बसल्याबसल्या या अवघड परिस्थितीतनं शिताफीनं मार्ग काढला. आपल्या अनुयायांना नेत्रपल्लवी करुन महा स्मृतिचिन्ह उचलून न्यायला सुचवलं. काहींची हस्तपल्लवी काम करु लागली . काही जणाचे ड्रायव्हर या प्रकाराला सराईत असल्यामुळे त्यांनी बिनबोभाटपणे मालकांना मिळालेल्या भेटी उचलून नेल्या.... सगळया महा स्मृतिचिन्हांच्या पितळी पट्टीवर घेणाऱ्याचं नाव कोरलेलं असल्यानं सर्जेराव मात्र निश्चिंत होते. दहा पाच न्यायचं विसरले तरी आपल्याला ते सावकाश घरपोच करता येईल असं त्यांनी मनोमन योजून ठेवलं होतं.

आदल्या दिवशी खास मुम्बईहून आलेले संपतरावांचे एकेकाळचे जानी दोस्त अॅडव्होकेट आगळे वकील यांनी फारच सुंदर भाषण केलं...संपतरावांच्या कर्तबगारीचा काळ त्यांनी श्रोत्यांना उलगडून दाखवला...अनेक जुन्या आठवणीही त्यांनी जागवल्या.... सर्जेरावांनी त्यांचाही सत्कार एक महा स्मृतिचिन्ह देऊन केला. भाषण संपवून खाली बसल्यापासनं आगळे वकिलांसमोर वेगळंच प्रश्नचिन्ह उभं राहिलं. त्यांच्या 'साठी' च्या सत्काराच्या वेळीही त्यांना एवढं अगडबंब महा स्मृतिचिन्ह मिळालं नव्हतं आता ते घरापर्यन्त कसं न्यायचं या चिंतेनं ते काळवंडून गेले. काच फोडून हंडा कळशी काखेत घेऊन आख्ख्या गावाला वळसा घालून यावं ,असं त्यांना वाटू लागलं. त्यांच्या घशाला कोरड पडली . मिनरल वॉटरची बाटली तोंडाला लावताना त्यांना हंडयाचाच विचित्र भास झाला. 'कळा (कळशा ) ज्या लागल्या जीवा, कुणाला काय सांगाव्या ? 'अशा अगतिक अवस्थेप्रत ते जाऊन पोचले. इतरांची भाषणं ऐकण्याकडे त्यांचं लक्ष लागेनासं झालं...विक्रमराजाच्या खांद्यावर वेताळ जसा पुन्हा पुन्हा जाऊन बसतो तशी त्यांची गत झाली .. ते चोरटया नजरेनं

पायांशी लोळण घेणाऱ्या महा स्मृतिचिन्हाकडे केविलवाण्या आशाळभूतपणे पाहात राहिले. 'काय घेऊन आले ,तर म्हणे हंडा न कळशी !! ' असे बायकोचे जळजळीत उद्‌गार त्यांच्या मनाच्या कानांना ऐकू येऊ लागले.

कार्यक्रम आटोपल्यानंतर झालेल्या महाभोजनातही त्यांचं लक्ष लागलं नाही...वास्तविक व्यासपीठावरनं भोजन मंडपाकडे जाताना ते महा स्मृतिचिन्ह मुद्दामच विसरुन गेले...त्याच्या कचाटयातनं काही काळ तरी सुटका झाल्याचा दिलासा त्यांना वाटला...

महा पंगतीचा आस्वाद घेऊन आगळे वकील लॉजवर आले. जेवणाची सुस्ती येऊन ते गाढ झोपी गेले. थोडा वेळ त्यांना महा स्मृतिचिन्हाचा चांगलाच विसर पडला.

संध्याकाळी सर्जेरावांचे कार्यकर्ते महा स्मृतिचिन्हासह लॉजवर आले तेव्हा आगळे वकील शतपावली घालीत होते. उद्या सकाळच्या एस्‌टीचं रिझर्व्हेशन असलं तरी महा स्मृतिचिन्ह इथंच ठेऊन मध्यरात्रीच आपण पोबारा करावा ,असं त्यांना वाटू लागलं. महा स्मृतिचिन्हासह कार्यकर्त्यांना बघताच आगळे वकील गर्भगळीत झाले.. दोनजणांनी पेलून आणलेले हे महा काय स्मृतिचिन्ह एस्‌टी. तनं मुम्बईला कसं न्यायचं या नुसत्या विचारानं त्यांना घाम फुटला... 'काही बोलायाचे आहे पण बोलणार नाही' अशी त्यांची अवस्था झाली. कार्यकर्ते गेल्यावर त्यांनी ते एकटयानं उचलून पाहिलं. एखादी गोणटी तरी मागून घ्यायला हवी. असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला..

रात्री सगळीकडे निवान्त झाल्यावर आगळे वकिलांच्या भेटीला सर्जेराव आले. ओझ्याच्या भीतीनं ते व्याकुळ झालेले आहेत हे सर्जेरावांच्या सराईत नजरेला चटकन समजलं...त्यावेळी आगळे वकिलांसमोर एस. टी. तली गर्दी आणि तिच्यात हेलकावे खाणारे ते स्वता तरळत होते. सर्जेराव त्यांना जवळ घेत म्हणाले,

"काय काळजी करु नका वकील सायेब...हये मृतिचिन्ह ...हणमंतरावांच्या हट्‌टापायी भव्य दिव्य आन अवाढव्य केलंय. मंत्रीसंत्री यांच्यासाटी खास. ती ग्येली बी त्यांच्यासगट आगदी बिनबोभाट. तुमची आडचन माज्या दुपारच्यालाच ध्यानात आली...तुमी काई मुद्दामून हये झेंगट जेवनाच्या येळेला इसरला नाईत. म्हनून उद्या सकाळच्याला तुमी पेशल टॅक्सीनं मुंबईला जावा ...माजं जमलं तर मी बी येईल तुमच्यासंगं. त्याचाच बंदोबस्त करुन मी आलोय ...बाकी तुमचं भाशन लईच बेस्ट जालं बघा...तुमच्यासारकी इदवान मान्सं न्हेमीच टॉप बोलत्यात ...म्हनून सत्कार समितीनं ॲक्च्युअल हंडा कळशीवालं मृतिचिन्ह तुमाला बी देयाचं ठरवलं...गपगुमान झोपा आता ...आच्छा गुटनाईट् "

आणि खरोखरच आगळे वकिलांना भव्य दिव्य सोहळयाची स्वप्नं पडत अवाढव्य महा स्मृतिचिन्हाच्या सहवासात गाढ झोप लागली !

oooooo

**(लोकसत्ता दिवाळी अंक ऑक्टोबर २००९)**

## ०४. बिन पगारी...फुल अधिकारी...

**सं**ध्याकाळ झाली तेव्हा डॉ. तुषार चतुर  आपल्या आलिशान टोयाटोमधनं उतरुन लगबगीनं क्लिनिकमधे शिरले. नेहमीप्रमाणे त्यांच्या पॉश केबिनच्या बाहेरच्या दालनात उच्चभ्रू रुग्णांची एकच गर्दी उसळलेली होती. त्या सर्वा वरनं सुहास्य वदनानं कटाक्ष टाकत ते आपल्या फिरत्या खुर्चीत स्थानापन्न झाले. सकाळी 'सकाळ' वाचून प्रसन्न झालेली त्यांची चित्तवृत्ती दुपारच्या एक वाजेपर्यन्त शेवटचा रूग्ण तपासतानाही टिकून होती. फार दिवसांनी त्यांनी पुस्तकाच्या कपाटातनं दुपारी ग्रेसच्या 'संध्याकाळच्या कविता' वाचून काढल्या. *'क्षितिज जसे दिसते तशी म्हणावी गाणी, देहावरची त्वचा आंधळी छिलून घ्यावी कोणी, गाय जशी हम्बरते तसेच व्याकूळ व्हावे, बुडता,बुडता सांजप्रवाही अलगद भरूनी यावे'* असं स्वताशीच गुणगुणत पहिल्या रुग्णाची ते वाट पाहू लागले. आता रात्रीच्या दहा वाजेपर्यन्त बाहेरच्या रुग्णांची गर्दी ओसरणार नाही याचा त्यांना नेहमीप्रमाणे अंदाज आला. वीस वर्षापूर्वी आपण वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थी होतो आणि आज एक प्रथितयश डॉक्टर झालो,या विचारानं डॉ. चतुर मनोमन कमालीचे सुखावले. दरम्यान बाहेर बसलेल्या स्वागतिकेनं रुग्णांची लांबलचक  यादी त्यांच्या पुढयात आणून ठेवली. ती न्याहाळत असताना टेबलावरचा टेलीफोन खणखणला.  साहजिकच डॉक्टरांची मुद्रा त्रासिक झाली. 'संध्याकाळची बोहणी ' ठीक व्हायला हवी ,असा विचार मनात घोळवत त्यांनी फोनला प्रतिसाद दिला.

" हॅलो...कोण?"

" अरे तू डॉक्टर तुषारच बोलतो आहेस ना?"

" होय आपण?"

आपल्यासारख्या सुप्रतिष्ठीत डॉक्टराला एकेरी संबोधणारी ही महामाया कोण असावी याचं त्यांना कोडं पडलं. ज्या अर्थी एवढया अधिकारवाणीनं जे कोणी बोलतंय त्याअर्थी तो आपलाच एखादा उमेद्वारीच्या काळातला रूग्ण असावा असं त्यांना वाटून गेलं.

"मी तुझी मेडिकल कॉलेजातली म्याडम बोलते आहे ...चिकटे म्याडम ...ओळखलंस?"

डॉक्टरांनी पाठीमागे रेलून डोकं खाजवलं अन् त्यांचं मन भूतकाळात  गेलं. त्यांना आपले एकेक गुरुवर्य आठवू लागले. काही नग होते तर काही हिमनगासारखे होते. काही पाटया टाकणारे तर काही मनापासनं शिकवणारे...काही त्यांच्या बॅचला ब्याद समजणारे तर काही त्याच बॅचला यादगार मानणारे...चिकटे मॅडम कॉलेजात शिकवू लागल्या  तेव्हा त्या नवोदित आणि डॉ. चतुर यांची  बॅच प्रस्थापित होऊन  निरोपाच्या उंबरठयावर येऊन पोचली होती. त्यामुळे चिकटे मॅडमशी त्यांची केवळ तोंडओळख झाली होती. स्नेहसम्मेलनात त्यांना मिळालेला 'फेविकॉल नम्बर वन' हा फिशपॉण्ड अचानक आठवून गेला. काहीतरी औपचारिक  बोलून फोन ठेवावा अन रुग्ण तपासणी सुरु करावी असं मनाशी योजून डॉक्टर वरकरणी म्हणाले,

“व्वा ओळखलं म्हणजे काय? ओळखलंच...अहो, तुम्हाला कधीच विसरणार नाही आमची ब्याच! किती अबोल होतात तुम्ही !! प.. ण.. माझा फोन नंबर तुम्हाला कसा मिळाला ? ”

डॉक्टरांच्या डोळयांसमोरनं चिकटे मॅडमची चिकणी, चटपटीत देहयष्टी तरळून गेली.

“ नशीब माझं... ओळख तरी दाखवलीस. अरे, दुपारपासनं आत्तापर्यन्त वीसेक फोन लावले पण एक्कानं म्हणून ओळख नाही दाखवली ...आणि तू म्हणतोस तशी अबोल राह्यली नाही हं मी...! चांगली बोलभांड अन् जाडजूड झाल्याचं मिस्टरच म्हणतात मला! आणि...फोन नंबर मिळणं आता काही अपुर्वाईची गोष्टच राहिली नाहीय...मंदारनं दिला. आगदी तत्परतेनं ”

चिकटे मॅडमनी नमनाला घडाभर तेल घालायला सुरुवात केली हे लक्षात येताच डॉक्टरांना ‘ आलिया भोगासी’ सादर व्हावं लागणार याची जाणीव झाली. तुकोबाच्या या अभंगाचा विडंबनात्मक उत्तरार्ध म्हणजे ‘नसेल पातळ ,नेसावे धोतर’ या ओळी त्यांना आठवून गेल्या ! मंदार हा डॉक्टरांचा सहध्यायी होता आणि आता प्रतिस्पर्धी.. आपल्यावर आलेला डाव दुसऱ्यावर ढकलण्याइतका त्याच्यासारखा तत्पर प्राणी जगात कोणी नाही, ही त्याची खासियत डॉ तुषारना चांगलीच अवगत होती. त्याचा कावा डॉक्टरांच्या लक्षात आला. अशी कावेबाजी त्यांच्या स्वभावात नव्हती.

“ हो.. का.. ? हे काही माहीतच नव्हतं मला... बरं ते जाऊ द्या...लग्न कधी केलंत मॅडम तुम्ही?”

“अरे झाली की बारा वर्षं बघता...बघता... मिस्टरच डीन झाले आता कॉलेजचे...त्यांनीच माझ्यावर जबाबदारी टाकली माजी विद्यार्थीसंघ स्थापन करण्याची .. ”

“हो? का ? छान ...छान .. ”

चिकटे मॅडमचे यजमानही ‘फेविकॉल नम्बर टू ’ असावेत असं वाटून डॉक्टरांना हसू फुटलं. चिकटे मॅडम देणगीचा आकडा ऐकल्याशिवाय थांबणार नाहीत याची कल्पना येऊन लवकर सुटका होण्यासाठी डॉक्टर म्हणाले “ हं .. बोला मॅडम .. किती हवी गुरु दक्षिणा ? काय आज्ञा ? ”

“देणगी तर काय...द्यालच तुम्ही मुलं...तुम्हाला काय कमी आहे म्हणते मी.. ‘चारो उंगलीया घी मे ’आहेत सगळयांच्याच.. माजी विद्यार्थ्यांकडनं एक्वीस एक्वीस हजार घ्यायचं ठरलं आहे.... ”

“कबूल म्याडम.. लगेच पाठवतो इन्टरनेट ब्यांक थ्रू... अकाउन्ट नम्बरचा एसेमेस करा म्हणजे झालं. आणखीन् काय आज्ञा आहे तुमची ? ”

फोन लवकर बंद करण्याच्या अपेक्षेनं डॉक्टर पुटपुटले आणि हाच धागा घट्ट धरुन चिकटे मॅडम पुन्हा बोलू लागल्या

“आऽऽज्ञा... !! नेमक्या याच शब्दांसाठी आसुसलेले होते रे मी ...अरे कॉलेजचा माजी विद्यार्थी संघ स्थापन झालाय ...आणि मी त्याची अध्यक्ष झालीय...तसा काहींचा विरोध होता ...पण मीच बाजी मारली.. ”

“ अरे .. व्वा.. अभिनन्दन ”

‘’धन्यवाद...आणि आता उपाध्यक्ष एखादा माजी विद्यार्थीच असावा असंही ठरलं. सकाळपासनं त्याच्याच शोधात आहे ना मी.. मुम्बईचा एकही डॉक्टर हे पद घ्यायला राजीच नाही रे. म्हणून पुण्याकडे मोर्चा वळवला. मंदार माझ्या नात्यातला त्यालाच गळ घातली मी. तर त्यानंच मला तुझ्या नम्बरचा एसेमेस केला. आता तर तो फोनही उचलत

नाहीये. तेव्हा अध्यक्ष म्हणून माझी आज्ञा अशी की तू  उपाध्यक्ष म्हणून...माझा सहकारी म्हणून काम करायचंस .... काऽय? आहेस ना तयार ?"

"ऑ.... छे...छे.. अहो...मला  अजिऽऽबात ऽऽ जमणार नाही...वेळच नसतो माझ्याकडे.. क्लिनिकला जोडून डिसपेनसरी सुरू करायची आहे मला. तुम्ही या उद्घाटनाला.. पत्रिका पाठवेन ठरल्यावर . "

"अरे.. तुषार.. असं काय करतोस... नाही का म्हणतोस.... केव्हडा सन्मान आहे हा...इतर मुलांना तो मागून सुद्धा मिळणार नाही.. "

" सॉरी... म्याडम..."

" सॉरी म्हणणं सोप्पं असतं.... सक्काळपासनं हाच शब्द ऐकते आहे मी.. पहिल्यांदा तू आज्ञा म्हणालास आणि आता सॉरी !! "

" नाही म्हणजे काय.. काय.. कामं असतात उपाध्यक्षाची ?" पुसटशा आठवणाऱ्या चिकटे मॅडमच्या सान्त्वनासाठी  डॉक्टरांनी विचारणा केली. 'बुडत्याला काडीचा आधार' मिळावा तशी चिकटे मॅडमची अवस्था झाली. वाऱ्यावर स्वार झालेल्या मॅडमना उत्साहाचं भरतं आलं .

"तशी काही विशेष कामं नसतील रे.... पहिलं काम कॉलेजच्या स्थापनेपासूनच्या माजी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी करावी लागेल...फोन,मोबाईल नंबर मिळवावे लागतील...मग काय, सम्पर्क  फारच सोपा झालाय हल्ली...याद्या झाल्या की ...माहितीपत्रकाचा मसुदा करावा लागेल आणि छापून घ्यावा लागेल ...देणग्या घेण्यासाठी पावती पुस्तकं छापून घ्यावी लागतील...किमान तालुक्यांच्या गावी जाऊन आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी घ्याव्या लागतील...त्यांच्याकडनंच देणगीचे मोठमोठे आकडे पडले पाहिजेत...कमेटीच्या मिटिंगा केव्हा घ्यायच्या हे मी ठरवेल ...त्याची काळजी तू नाही करायची ...तू फक्त त्यासाठी वेळ काढायचा...आणि मिटिंगांना इमानेइतबारे हजर राह्यचं. बहुतेक मुम्बईला होतील.. एखादी तुझ्या पुण्यातसुद्धा घेऊ की आपण..."

चिकटे मॅडमची टकळी सुरु झाली आणि डॉक्टर  अधिकाधिक अस्वस्थ होऊ लागले . टेबलावरच्या पेपरवेटशी त्यांचा चाळा चालला होता ...तो एकदम भिरकावून द्यावा रिसिव्हरचा गळा घोटावा, असं त्यांना वाटू लागलं.

"ऐकतो आहेस ना रे तुषार ?" मॅडम पुढे बोलू लागल्या

माजी विद्यार्थ्यांच्या माहितीची स्मरणिका काढायची ठरलं आहे .. त्यासाठी तुला  लेख, जाहिराती, छायाचित्रं असं सगळंच गोळा करावं लागेल.. तू पण एखादं आर्टिकल लिही माझ्याविषयी अन् तुझ्या सरांविषयी...पत्ता तुझाच देऊ म्हणजे तुझी वणवण कमी होईल.. काय? .. छपाईचं काम माझ्याकडे राहील. प्रुफं  तुझ्याकडेच पाठवीन कुरीयरनं. कसं ? बोलत का नाहीस तू ? "

"ऐकतो आहे ना मॅडम ...पण एवढं सगळं करुन मला काय मिळणार ?"

डॉक्टरांनी हताश होत कसंबसं विचारलं. तेवढयात स्वागतिका आणि दोन चार पेशंटस् त्यांच्या केबीनमध्ये डोकावून गेले. संभाषणाला खळ पडत नव्हता आणि डॉक्टरांची अवस्था 'घाईत घाई ,विंचू चावला ग बाई ' अशी झाली. अवघड जागी दुखणं आणि जावई वैद्य .. असं त्यांना वाटू लागलं !

“ तुला काय मिळणार म्हणजे? खूपच मिळणार.... मातृसंस्थेची सेवा केल्याचं अपूर्व समाधान .... दांडगा जन सम्पर्क साधल्याचं पुण्य गाठीशी बांधशील तू... शिवाय लेटर पॅडवर माझ्या नावाखालती तुझं नाव असेल.. उपाध्यक्ष म्हणून ...समारंभात तुझी खुर्ची असेल अगदी माझ्याशेजारी उपाध्यक्ष म्हणून...सगळया फोटोंमध्ये तूच असशील माझा सहकारी म्हणून ...मी अमेरिकेत जात असते ना अधनं मधनं ...तेव्हा तूच असशील सर्वाधिकारी उपाध्यक्ष म्हणून... आणखीन् काय हवं तुला अं ?”

डॉक्टरांनी निःशब्द आणि निरुत्तर होत रिसीव्हर खाली ठेवला ! बिनपगारी फुल अधिकारी होण्याचं भयावह दिवास्वप्न त्यांना भेडसावू लागलं.

संध्याकाळी असलं भलतंच ‘क्षितिज’ दिसल्यानं आणि ‘गाईचा हंबर’ ऐकू आल्यानं डॉक्टर कमालीचे व्याकुळ झाले. आपल्या देहावरची त्वचा कुणीतरी छिलून घेत आहे, असा त्यांना विचित्र भास होऊ लागला! रुग्णांच्या सांज प्रवाहात बुडण्याऐवजी आपण भलत्याच प्रवाहात बुडतो की काय असं त्यांना वाटू लागलं!

स्वागतिकेनं आणलेला पाण्याचा ग्लास त्यांनी एका दमात रिचवला ! तिला पहिला रुग्ण पाठवायला सुचवलं.

थोडया वेळानं फोनची घंटी नव्या जोमानं वाजू लागली.

oooooo

## ०५. ताणू किती...ताणू किती.. कार्यशाळा दचकली

**के**बिनचं दार लोटून प्राचार्य सापळे खुर्चीवर स्थानापन्न झाले.

शिपायानं आणलेल्या टपालाची उस्तवारी करण्यात ते नेहमीप्रमाणे गर्क झाले. विद्यापीठाकडे प्रस्तावित केलेल्या 'ताणतणाव मुक्ती कार्यशाळे' चं मंजुरी पत्र वाचल्यावर त्यांना हायसं वाटलं. अशी कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. स्मरणपत्रांचा भडीमार चालवला होता. ही कार्यशाळा **'राज्य परिवहन मंडळातील चालक वाहक यांचे ताणतणाव व्यवस्थापन '** या विषयावर असावी असं त्यांनी विद्यापीठाला कळवलं होतं. त्याला मान्यता मिळाल्यानं ते आनन्दीत झाले.

प्राचार्यांनी बेल वाजवून उपप्राचार्य कोल्हे,प्रा. मुंगळे आणि प्रा. लांडगे यांना लगोलग केबिनमध्ये बोलावून घेतलं.

"या.. मंडळी.. ताणतणाव कार्यशाळा मंजूर झाली.. एकदाची.. "

"अरे.. व्वा,सर ,अभिनंदन.. " प्रा. मुंगळे शिष्टाचार म्हणून पुटपुटले.

" अहो.. अभिनंदन कसलं करता ? सान्त्वन करा एकमेकांचं.. " उपप्राचार्य पोक्तपणे उद्‌गारले.

"म्हणजे.. कार्यशाळा होईपर्यन्त आपलाच ताणतणाव वाढत जाणार .. असंच सुचवायचंय ना तुम्हाला.. " प्रा. लांडगे सात्त्विक भावानं म्हणाले.

"नो.. कॉमेन्टस्.. प्रोसीड फरदर.. ही कार्यशाळा आपल्याला यशस्वी करुन दाखवायची आहे. लवकरच आपण स्टाफ मीटींग घेऊन समित्या अन् उपसमित्या नेमून टाकू.. चला कामाला लागा.. "

प्राचार्यांनी समारोप करुन दुसऱ्या कामाला सुरवात केली.

* *

कार्यशाळा संयोजनाची जबाबदारी असलेली त्रिमूर्ती प्रा. कोल्हे, प्रा. लांडगे, प्रा. मुंगळे सशाच्या गतीनं कामाला लागले. जिल्ह्यातल्या सर्व रा. प. आगारातल्या सुमारे शंभर वाहक चालकांना आमंत्रण पत्रं रवाना झाली. ताणतणाव मुक्तीबाबत मार्गदर्शन करण्यात माहीर असलेल्या नामवन्तांना पाचारण करण्याचं ठरलं. निवास भोजन प्रवास यांच्या बाबतीतलं नियोजन साकार होऊ लागलं.

* *

कार्यशाळा आठ दिवसांवर येऊन ठेपली. फोनाफोनीतनं ताणतणावाला हलके.. हलके .. बाळसं येऊ लागलं...

" हॅलो.. सापळेसर ना.. हं मी .. हरणे म्याडम बोलतेय.. अहो, कार्यशाळेत मला **'कंडक्टर प्रवासी यांच्यातलं उंदरामांजराचं नातं: एक मनोविश्लेषण '** या विषयासाठी बोलावलंय. पण सर, तिकडे स्वाईन फ्ल्यू आहे म्हणे.. मग मी काय करु विचारायला फोन केला.. "

" हां.. आहे मॅडम.. इकडे स्वाईन फ्ल्यू आहे. पण आम्ही राहतोच ना इथं.. या तुम्ही... तुम्हाला काही होणार नाही.. बिनधास्तपणे या.. फक्त मास्कच्या भरपूर जोडया आणा.. ओके ? "

हरणे मॅडमनी तणावमुक्त होत फोन बंद केला.

इकडे कोल्हेसरांच्या केबिनमधे डॉ. डुकरे यांचा फोन खणखणला,

"हं मी फोन अशासाठी केला.. मला तुम्ही **'ड्रायव्हर व कंडक्टरः साप मुंगुसाचं नातं: एक मनोवैज्ञानिक अभ्यास '** असा विषय दिलाय.. पण मी अजून एकदाही मुंगूसच पाहिला नाही हो.. त्याचाच तणाव झालाय माझ्या मनाला.. साप मात्र भरपूर पाहिले. तेव्हा काय करू? त्यांच्यात खरंच वैर असतं का हो? म्हणून फोन केला "

प्रा. लांडगे यांनी डोक्याला हात लावला...

" वैर असतं असं गृहीत धरा अन लवकर काय ते सुचंल ते माझ्याकडे द्या पाठवून.. मी बघतो त्याचं काय करायचं ते .. चालंल ना?"

प्रा. लांडगे यांच्या मनावरचा ताणतणाव डॉ. डुकरे यांना समजला की नाही, हे कळायला मार्ग नाही. इकडनं एखादं मुंगुस पकडून त्यांच्याकडे पाठवून द्यावं ,असा तणावग्रस्त विचार त्यांच्या मनात येऊन गेला.

" हां.. प्रा. मुंगळेसरच ना? .. मी नागपुराहून बोलतोय.. डॉ चित्ते .. ओळखलं ना? आपण नागालॅण्डला बरोबर होतो.. तुमच्याकडे म्हणे कार्यशाळा होत्येय.. मैनाताई पाखरेबाईंकडनं कळलं मला.. अहो, माझा पेपर तयार आहे.. विषय सांगतो.. **'राज्य परिवहन मंडळातले अधिकारी व कर्मचारी यांच्यातलं विळया भोपळयाचं नातं : एक शोध'**.. मग काय करू? देऊ पाठवून.. आं?"

मुंगळेसर मोठया धर्म संकटात पडले. त्यांना माहीत होतं की ,डॉ चित्ते भरघोस मानधन लाटण्यात पटाईत आहेत.. कार्यशाळेत 'विळाभोपळा' सादर करुन, पेपरचा आवळा देऊन मानधनाचा कोहळा घेऊन जातील याची मुंगळेसरांना कल्पना आली. त्यांनी गुळमुळीतपणे उत्तर दिलं,

" हरकत नाही.. बघू .. "

आपला तणावग्रस्त चेहरा डॉ. डुकऱ्यांना दिसणार नाही, याचंच मुंगळेसरांना समाधान वाटलं.

* *

सकाळपासनं प्रा. मुंगळे आणि लांडगे दुचाकीवरनं आचाऱ्याच्या शोधात शहरभर हिंडत होते. कार्यशाळेसाठी भोजनाची जबाबदारी घेतलेला शेरसिंग ॲडव्हान्स घेऊन पंजाबला निघून गेला. एक महिन्यानं येणार,असं त्यानं आजच मोबाईलवरून कळवल्यानं दोघेजण नव्या आचाऱ्याच्या शोधात निघाले. शेरसिंगला दिलेला पंचवीस हजाराचा ॲडव्हान्स कसा वसूल करायचा,या चिंतेचा ताणतणाव दोघांच्याही वागण्या बोलण्यावर दिसू लागला. तो कार्यशाळा आटोपेपर्यन्त मावळणार नव्हता. शेवटी गरूड नावाचा नवखा आचारी कसाबसा तयार झाला.

* *

कार्यशाळा चार दिवसांवर येऊन ठेपली.

दुपारपासनं प्राचार्य चिन्ताक्रान्त होऊन बसले होते. कार्यशाळेच्या उद्‌घाटनासाठी पालकमंत्री धसमुसळे येण्याचं नक्की झालं असताना आताच त्यांचे स्वीय सचिव कावळेसाहेबांचा फोन आला. त्यांनी उद्‌घाटन सकाळी दहाऐवजी दुपारी तीन वाजता आयोजित करायला सुचवलं. तसा वरुन आदेश असल्याचं बजावलं.

"आता सकाळपासनं दुपारपर्यन्त आलेल्या सगळया वाहक अन् चालकांचं लोणचं घालायचं का? एवढया वेळेत सगळयांकडनं पापड लाटून घेऊन वाळतसुद्धा घालता येतील" प्राचार्य सापळे विलक्षण उद्वेगानं स्वताशीच पुटपुटले. ताणतणाव वाढून प्राचार्य अस्वस्थपणे टेबलावरच्या काचेवर पेपरवेटच्या साह्यानं कॅरम खेळू लागले !

शिपायानं त्यांची मनःस्थिती दुरुन पाहिली आणि उपप्राचार्यांना बोलावून आणलं.

"काय झालं सर?"

प्राचार्यांनी अपशब्द वापरुन,कार्यशाळेचा उद्धार करुन इतिवृत्तान्त कथन केला.

उपप्राचार्य काही काळ विचारमग्न झाले. त्यानन्तर प्राचार्यांसमोर टाळी घेण्यासाठी हात पुढे करत ते म्हणाले,

" द्या टाळी.. शुभस्य शीघ्रम.. सर, लगेच पीएला फोन लावा.. आणि सांगा उद्‌घाटन आम्ही सकाळीच करुन घेऊ आणि मंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप करू. चालेल का .. विचारा.. "

"अरे.. व्वा.. छानच आयडिया.. " प्राचार्य तणावमुक्त होत उद्‌गारले.

"म्हणजे .. एका दगडात अनेक पक्षी मारता येतील. "

"कसे काय बुवा?"

"अहो.. मंत्री नाही म्हणजे कार्यशाळा वेळेवर सुरु करता येईल. ते सकाळी येणार म्हंणून लोक जमलेलेच असणार.. ते तीन वाजता यायचं म्हणतात तर अॅक्चुअली पाच वाजता येतील.. तोवर कार्यशाळेचा कार्यभाग आटोपून जाईल . त्यांच्या हस्ते प्रमाणपत्रं वाटण्याचं जाहीर करु म्हणजे सगळे वाहक,चालक, अधिकारी, कर्मचारी अगदी निमूटपणे थांबणार.. आणि आपली कार्यशाळा यशस्वी होणार.. म्हणून म्हणतो .. द्या टाळी. "

उपप्राचार्य बेरकीपणानं बोलले.

स्वीय सचिव कावळेसाहेबांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन दोघांनाही तणावमुक्त केलं!

* *

कार्यशाळेला तीन दिवस उरले. उपप्राचार्य त्यांच्या कार्यालयात बसले होते तेवढयात फोन खणखणला.

हॅलो.. कोल्हेसर.. मी येस्. टी. म्हामंडळाचा जिल्हा व्हातूक नियेंत्रक बोलतोय.. तुमची ती कार्यशाळा परवाच आहे ना... पण सर, त्याच दिवशी त्रिंबकेश्वराला निवृत्तीनाथाची यात्रा आहे.. त्यासाठी सगळया जिल्ह्यातनं बस गाडयांसह ड्रायवर कन्डक्टरांना डयूटी लावायची ठरलं!"

"आॅ.. असं काय.. करता?.. सगळी तयारी झाली हो.. भरपूर खर्चही केलाय हो कॉलेजनं" उपप्राचार्य तणावग्रस्त होत म्हणाले.

"हां. सर. निवृत्ती यात्रेचा अंदाजच आला नाही.. क्यान्सल करता येईल का आपल्याला.. शिमग्याला घेऊन टाकू !"

" नाही .. नाही.. पालकमंत्री धसमुसळेसाहेब सकाळपासनं संध्याकाळपर्यन्त.. " उपप्राचार्यांचं बोलणं मधेच तोडून 'व्हातूक नियेंत्रक'म्हणाले.

"सर.. हे पालकमंत्र्याचं येनं.. कव्हा ठरलं.. आॅ? अहो .. मग आमालाच आमचा प्ल्यान बदलावा लागंल. "

"अहो.. बदलाच.. सगळया वाहक चालकांना प्रमाणपत्रं देणार आहोत आम्ही. शिवाय तुमचा सत्कार होईल पालकमंत्र्याच्या हस्ते.. "

उपप्राचार्यांची ही मात्रा वाहतूक नियंत्रकांना बरोबर लागू पडली, सत्कार म्हणजे एक आणखी नारळ असा साधा हिशेब त्यांनी मनाशी मांडला.

वाहतूक नियंत्रक उत्साहीत होऊन म्हणाले,

"आसं काही आहे का .. सर? माला आयडियाच आली नाही.. आता मी आसं करतो.. दुसऱ्या जिल्हयातला स्टाफ आणि बसगाडया बोलावतो.. म्हंजे 'आपल्या' कार्यशाळेला हंड्रेड परसेन्ट हुपस्थिती राहील.. निरधास्त ऱ्हावा. "

काही वेळापूर्वी तणावग्रस्त झालेले उपप्राचार्य क्षणात तणावमुक्त झाले!

* *

कार्यशाळा दोन दिवसांवर आली.

कॉलेजरस्त्यावर मुरुम टाकायला आलेल्या मालट्रकच्या धडकेनं दूरध्वनी जोडणारे आणि वीज पुरवठा करणारे दोन खांब कलथून गेले. त्यामुळे पी. डब्लू. डी. खातं दिवसभर ताणतणावग्रस्त झालं होतं,तथापी पालकमंत्र्यांच्या आगमनाच्या नुसत्या धाकानं कर्मचाऱ्यांनी रात्रीचा दिवस करुन अख्ख्या कार्यशाळेला तणावमुक्त बनवलं!

* *

कार्यशाळेच्या आदल्या रात्री प्राचार्य सापळे,उपप्राचार्य कोल्हे, प्रा. लांडगे, प्रा,मुंगळे यांची एकच धावपळ उडाली. तशा छोटयामोठया ताणतणावाच्या ठिणग्या दिवसभरात उडतच होत्या. स्वाईन फ्ल्यूच्या भीतीनं हैराण होऊन हरणे मॅडमनी फोनवरनं नकार कळवला म्हणून महाविद्यालयाच्याच मांजरे मॅडमच्या गळयात त्यांचा आलेला निबंध वाचण्याची घंटा बांधण्यात आली. डॉ. डुकरे यांनी फॅक्सवरनं निबंध पाठवला आणि आपण जिवंत मुंगुस पाहिल्यामुळे शुभशकुन झाल्याचं आवर्जून कळवलं. डॉ. चित्ते चित्याचा चपळाईनं निबंध लिहून सकाळपासनं गावात आले आणि एका आलिशान हॉटेलात मुक्कामाला थांबले.

* *

भोजनाची जबाबदारी घेतलेल्या गरूड आचाऱ्याचा मोबाईल हरवला. त्यामुळे सगळा स्वैपाक घरी करुन टेम्पोनं कॉलेजात आणण्याचा त्याचा निर्णय प्रा. मुंगळे आणि लांडगे यांना समजेपर्यन्त दोघांच्या पोटात भीतीचा गोळा उठून जीव टांगणीला लागला होता.

ठरल्याप्रमाणे सकाळी 'ताणतणाव मुक्ती कार्यशाळे'ला प्रारंभ झाला. पालकमंत्री समारोपाला येणार असल्यानं उद्‌घाटन समारंभ साधेपणानं सुरु झाला. सभागृहात प्राचार्य, उपप्राचार्य आणि अन्य मंडळी आसनस्थ झाली. प्राचार्य स्वागतपर भाषण करत असताना भरगच्च भरलेल्या सभागृहाच्या मागल्या रांगेत उभं राहून प्रा. लांडगे उपप्राचार्यांच्या दिशेनं हाताचं मनगट घडयाळाच्या लंबकासारखं अर्ध गोलाकार फिरवू लागले. त्यांची ही खूण आसनस्थ मंडळीच्या लक्षात येईना. सर्वजण एकमेकांकडे बघत आपली मनगटं तशीच अर्ध गोलाकार फिरवीत 'म्हणजे काय? 'असं खाणाखुणांसह विचारु लागली. व्यासपीठस्थ मंडळींच्या या खाणाखुणा श्रोत्यांमधे जाऊन पसरल्या. काहीजणांनी मागे वळून बघीतलं तेव्हा प्रा. लांडगे ताणतणावानं निथळत तीच खूण वारंवार करत होते. प्राचार्य शब्दरुपी स्वागत करण्यात दंग होते. त्या तणावग्रस्त खुणेचा नेमका अर्थ चाणाक्ष उपप्राचार्यांच्या लक्षात आला. त्यांनीही मूकपणे खाणाखुणांनी उत्तर देण्याची खटपट सुरू केली. पण प्रा. लांडगे यांच्या डोक्यात उजेड पडेना आणि त्यांच्या मनगटाच्या अर्ध गोलाकार खुणाही थांबता थांबेना! त्या जशा तणावग्रस्त तशा हताशग्रस्त होऊ लागल्या. प्राचार्य भाषण थांबवून उपप्राचार्यांकडे पाहू लागले तर तेही तशाच खुणा करण्यात मग्न होते. शेवटी न राहवून उपप्राचार्य उठले. प्राचार्यांना बाजूला सारुन ते माईकवरनं प्रा. लांडग्यांना उद्देशून म्हणाले ,

" लांडगेसरांसाठी महत्त्वाची सूचना आहे .. नारळांची आय मीन... श्रीफळांची गोणी.. आचाऱ्याच्या सामानात गेली असेल. ती त्यांनी तिकडे जाऊन शोधावी .. आणि आभार प्रदर्शनापर्यन्त इकडे आणावी... ध.. न्य.. वा.. द.. "

आणि अवघं सभागृह तणावमुक्त होत प्राचार्यांचं शब्दरूपी स्वागत सुहास्य वदनानं स्वीकारू लागलं!

oooooo

**(नगारा दिवाळी अंक २०१०)**

## ०६. छबीताईंच्या पाक्कृतीतली खुबी...

**छ**बीताई संसारे यांना क्यू टी. व्ही. चॅनलतर्फे पाक्कृती सादर करण्याचं आमंत्रण आलं तेव्हा त्या वांग्याचं भरीत करीत होत्या. त्यांना आनंदाचं भरतं आलं आणि तो उकळणाऱ्या दुधासारखा उतू जाऊ लागला. पतिराजांनी त्यांच्या हट्टापायी येवल्याहून उंची शालू खरेदी करुन आणला. चित्री करणासाठी निघताना अंगठे सोडून आठही बोटात त्यांनी सोन्याच्या अंगठया परिधान केल्या. ब्यूटी पार्लरमध्ये जाऊन सजलेल्या छबीताई खास टॅक्सी करुन क्यू टी. व्ही. च्या स्टुडीयोत जाऊन पोचल्या...

तिथल्या. स्वागतिकेनं छबीताईंना संयोजिका लता लाटणे यांच्याशी गाठ घालून दिली. चित्रीकरणाची पूर्वतयारी होत असताना लताताईंनी छबीताईंना बोटातल्या सर्व अंगठया काढायला लावल्या. त्यांच्या हातांना विशेष मेकप करण्यात आला. कारण छबीताईंच्या छबीपेक्षा त्यांच्या हातांचीच छबी सर्वाधिक काळ दिसणार होती. आधीच्या मेकपवर पुन्हा मेकप झाल्यानं त्यांची छबी भाजलेल्या खाऱ्या दाण्यासारखी दिसू लागली. त्या बिग बीप्रमाणे डावखुऱ्या आहेत हे लक्षात आलं. त्यानुसार चित्रीकरण ओटयावरील घटक पदार्थांची मांडामांड बदलण्यात आली.

लताताईंनी 'हसतमुख रहा','तणावरहित दिसा', 'चुका करू नका,' 'गडबडून जाऊ नका 'इत्यादी सूचना छबीताईंना दिल्या आणि कॅमेरा सुरू झाला...

लताताईंनी सराईतपणे औपचारिक गप्पांना सुरुवात केली. छबीताईंना आनंदाचं भरतं आलं. अभिप्रेत नसताना त्या आपल्या सासरमाहेरचा अनावश्यक तपशीलाचं चऱ्हाट वळू लागल्या...लताताईंनी त्यांना नाउमेद केलं नाही. कारण संकलिका करूणा कात्रे त्यांच्या बोलण्याच्या चित्रीकरणावर सफाईनं कात्री चालवतील याची लताताईंना खात्री होती....

पाक्कृती तयार करण्यासाठी दोघीजणी ओटयासमोर उभ्या ठाकल्या. कॅमेरावाल्यानं सगळं ठाकठीक असल्याची खूण करताच लताताई बोलू लागल्या...

" हं.. छबीताई आज तुम्ही कोणता पदार्थ करून दाखवणार आहात .. आमच्या प्रेक्षकांना?"

"शेवग्याच्या शेंगांचं मलईदार पिठलं.. "

"हे पिठलं सगळयांनाच ठाऊक आहे .. पण आपण मलईदार का करणार ?"

"एकदा माझ्याकडनं असं गार झालेलं पिठलं साईच्या भांडयात ओतलं गेलं .. घरच्यांनी ते चवीचवीनं खाल्लं. त्यातनं माला या पदार्थाचा शोध लागला" छबीताईंनी एका दमात सांगून टाकलं

"बरं .. आता .. त्यासाठी तुम्ही काय काय वापरणार आहात .. ते सांगा आमच्या प्रेक्षकांना ..."

छबीताई बोटानं पदार्थ दाखवू लागल्या

"या .. उकडलेल्या शेंगा.. मी.. घरनंच उकडून आणल्या आहेत... ते डाळीचं पीठ कालवलेलं...तेल... तयार मलई बाजारातनं आणलेली...चवीपुरतं मीठ.. हळद .. तिखट.. "

" बरं छबीताई आता आपण काय करायचं?"

कढईमध्ये तेल टाकायचं.. ते गरम झाल्यावर..."

असं बोलताना दोघीजणी गॅस सुरु करायलाच विसरल्या! बराच वेळ झाला तरी तेल का गरम होत नाही याचं दोघींना कोडं पडल. ही चूक कॅमेरावाल्याच्या लक्षात आली बर्नर शिलगावून पुन्हा पहिल्यापासून रीटेक घेण्यात आला !

"गरम झालेल्या तेलामध्ये मोहरी...हळद आणि तिखट घालायचं.. नंतर लगेच कालवलेलं डाळीचं ओतायचं.. उशीर केला तर फोडणी जळून जाईल.. हळद काळीकुट्ट होईल.. "

"व्वा फारच छान टिप दिली. भगिनींनो... लक्षात ठेवा हं. "

छबीताई बोलत होत्या. कृती करून दाखवत होत्या.. त्याच वेळी डाळीचं पीठ फारच पातळ झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं! आता पिठलं होतं की डाळीच्या पिठाची आमटी होते...याची त्यांना चिंता वाटू लागली...लताताईंना कसलाच घोर नव्हता त्या प्रसन्न चित्तानं पाककृती न्याहाळत होत्या...इकडे छबीताईंनी डाळीचं पीठ वाजवीपेक्षा जास्तीत जास्त ढवळून कसंबसं पिठलं वाटेल इतपत ठिकाणावर आणलं!

"आता पुढे काय करायचं ते आपल्याला छबीताई सांगतील.. तोपर्यन्त आपण घेऊ या ब्रेक .. तुम्ही लिहून घ्या कृती"

छबीताईंना वाटलं .. आता आपल्याला खरोखरची विश्रान्ती मिळेल...तेवढया वेळात घरून आणलेल्या शेंगा कितपत उकडल्या आहेत हे तरी तपासून पाहू...पण जराही उसन्त न घेता लताताईंनी पोपटपंची सुरु केली.

"तर भगिनींनो शेवग्याच्या शेंगांचं मलईदार पिठलं खायला तयार व्हा...हं.. छबीताई.. "

कॅमेऱ्याचा रोख लताताईंवर असताना छबीताईंनी चपळाईनं उकडलेल्या शेवग्याच्या शेंगा बोटानं चाचपून पाहिल्या. अति उकडल्यामुळे त्यांचंच भरीत किंवा पिठलं झालंय हे त्यांच्यातल्या चाणाक्ष गृहिणीच्या लक्षात आलं.

"आता काय करणार ?"लताताई सुहास्य वदनानं म्हणाल्या.

"ती सुरी आणि चमचा द्या माझ्याकडे .. "

छबीताईंची ही मागणी ऐकताच लताताई किंचित काळ गोंधळल्या. कारण ही साधनं हाताशी नव्हती! मदतनिसानं ती कॅमेऱ्यात दिसणार नाही अशा बेतानं लगेच दिली.

" आता आपण उकडलेल्या शेंगांचे सुरीनं काप करु या .. आणि त्यांचा गर चमचानं एका बाऊलमध्ये जमा करू या...आणि आता ...हा गर शिजलेल्या पिठल्यात घालू या... "

भांबावलेल्या लताताई सावरल्या...उकडलेल्या शेंगांचे तुकडे टाकण्याऐवजी त्यांचा गर छबीताईंनी तयार पिठल्यात ओतलेला पाहून त्या चांगल्याच बुचकळयात पडल्या ! बाकी राहिलेल्या बाऊलवर कटाक्ष टाकत त्या म्हणाल्या..

"आता...या.. मलईचं काय ?"

"ती ज्याच्या त्याच्या आवडीनुसार.. पिठल्यात टाकावी...टाकली तरी चालेल नाही टाकली तर पिठलं अधिक चटकदार लागेल !"

याच वेळी प्रोडयुसरनं लताताईंना "फिनिश" ची खूण करुन कार्यक्रम संपवला.

हे अनोखं पिठलं आपल्याला पडद्यावर चाखावं लागलं नाही ,याचं अतीव समाधान त्यांना लाभलं.

छबीताई मात्र त्या दिवसापासनं आपल्या पाककृतीच्या प्रसारणाची आतुरतेनं वाट पाहत आहेत!

oooooo

## ०७ . मंगल कार्यालय बायांनी आक्रमिले ! !

**हा**श हुश करत सोपनराव,महिपतराव,हणमंतराव आणि संपतराव रिक्शातनं उतरले तेव्हा पहाटेचे पाच वाजले होते. प्रत्येकाजवळ अवजड बॅगा होत्या. सगळयांनी जाडजूड स्वेटर्स घालून तोंडाभवती मफलर्स गुंडाळून त्यावर कानटोप्या घातल्या होत्या. चौथ्या सिटाला घेण्यावरनं त्यांच्यात आणि रिक्शावाल्यामधे वादावादी झाली. शेवटी हमरीतुमरी आवरुन महिपतरावांनी भाडं वाढवून देण्याचा करार केला. त्यांचा रेल्वे स्टेशनपासनं मंगल कार्यालयापावेतोचा प्रवास बिनबोभाट पार पडला. रिक्शा भाडं देण्याची चट्टी सोपनरावांना बसली कारण त्यांच्याच आग्रहाखातर सगळे वाघापूरहून कोल्हापूरला भाचीच्या लग्नाला आले होते. भाचीच्या बापानं सोपानरावांना घसघशित रक्कम देऊन गावाकडनं जास्तीत जास्त वऱ्हाडी आणायला सांगीतलं होतं. त्यांच्या गळाला त्यांचे तीन मित्र लागले. प्रवास खर्च करुन उरणारी वरकड रक्कम सोपानरावांच्याच खिशात राहणार होती. त्यामुळे ते जाम खुश होते.

प्रथम उतरलेल्या हणमंतरावांनी करकचून आळस देऊन पाठीमागचं भव्य दिव्य आणि अवाढव्य असं तीन मजली मंगल कार्यालय न्याहाळलं. संपतरावांनी बॅगा बाहेर काढल्या. तेवढयात सिक्युरिटीच्या माणसानं जोरात शिट्टी फुंकली. चौघेही चांगलेच दचकले. सिक्युरिटीनं सगळया बॅगांवरनं धातुशोधक यंत्र फिरवलं आणि ओळखीसाठी हात पुढे केला. महिपतरावांनी चटकन शेकहॅंड घेऊन सगळयांच्या वतीनं " शुब परभात..."म्हणून टाकलं. तोंडातली शिट्टी काढून सिक्युरिटी म्हणाली,

"आवो शेक्यांड कायला घेता? संडासला जाऊन आलोय मी. लगीन पतरिका दावा..."

" कशाला आॅ कशाला ?"सोपनराव तिरीमिरीनं बोलले.

"आम्च्या मंगल कारयालयाचा रूल हाये तसा...वळखीशिवाय कुनालाच धाडता येत न्हाई आमाला... तुम्ची कनती पन वळख चालंल. "

तेवढयात दुसऱ्या मजल्यावरल्या ग्यालरीत दात घासणाऱ्या भाची नवरीनं सिक्युरिटीला खुणावलं आणि हुज्जत आवरुन चौघेही अवजड बॅगांसह आत शिरले. चालताना सगळयांच्या नजरा कार्यालयातल्या सोयी सुविधा न्याहाळत होत्या. महिपतराव सिगरेटी फुंकण्यासाठी सुरक्षित जागा हेरत होते. सोपानरावांना दातांना मशेरी लावण्यासाठी जागा हवी होती. हणमंतरावांजवळ विडयाच्या पानांची चंची होती. ते खिडकीच्या शोधात चालत होते. संपतरावांना टॉयलेट कुठे आणि कसं असेल याची विवंचना होती!

दुसऱ्या मजल्यावर वधुपक्षाची आणि तिसऱ्या मजल्यावर वरपक्षाची सोय होती. भाची नवरीनं तोंडातला टुथपेस्टचा तोबरा सांभाळत चौघांचं स्वागत केलं. तिचे आई वडील म्हणजे वधुमाता पिता रात्रीचे बंगल्यावर मुक्कामाला गेले होते.

भाचीनं आपले मामा सोपानरावांना आपल्या शेजारच्या रुम नंबर २११ मधे बॅग ठेवायला आणि त्यांच्या तिन्ही मित्रांना तिसऱ्या मजल्यावर रुम नंबर ३२२,३४४ आणि ३६६ मधे जायला सांगीतलं.

ही ताटातूट चौघांनी जड मनानं स्वीकारली!

दाबून नाष्टापाणी करुन चौघेजण नगर प्रदक्षिणा करुन आले. लग्नाची टाळी संध्याकाळची असल्यानं सारं कसं शान्त निवान्त होतं. दुपारचं भरपेट भोजन आटोपल्यावर चौघेही आपापल्या रुममधे परतले. प्रत्येक रुम दोन दालनांची आणि अॅटॅच्ड टॉयलेटची होती.

सोपानराव मशेरी लावून रुम नंबर २११ मधेबसून आल्या गेल्या सग्यासोयऱ्यांशी गप्पा गोष्टी करत बसले. त्यांची आधीच आलेली बायको जुन्या पुराण्या उखाळया पाखाळया काढण्यात गढून गेली. त्यामुळे तिचा नट्टा पट्टा करणं लांबणीवर पडत गेलं.

महिपतराव रुम नंबर३२२ मधे पोचले. आतल्या दालनात सिगरेटी ओढता ओढता त्यांचा डोळा लागला. हणमंतरावांनी रुम नंबर ३४४च्या खिडकीजवळ बस्तान मांडून चंचीतला पानांचा सरंजाम काढला. थोडया वेळानं ते कॉटवर आडवे झाले. संपतराव रुम नंबर ३६६ मधल्या टॉयलेटच्या सोयीवर भलतेच खुश झाले. तिचा वापर करुन तेही पहुडले आणि लगेच घोरु लागले.

संध्याकाळचे पाच वाजले. मंगल कार्यालयात बायकामाणसांची ,पाव्हण्यारावळयांची वर्दळ वाढली. बायकांच्या नट्टयापट्टयाला,वेणीफणीला आणि साडया बदलण्याच्या सोपस्काराला सुरवात झाली. वरपक्षाकडच्या बायकांची संख्या जास्त झाल्यामुळे त्यांचे घोळकेच्या घोळके नव्या कोऱ्या साडयांसह शेजार पाजारच्या रुम्समधे पांगू लागले. अनेक ठिकाणी पुरुषांना हुसकावून लावून बायकांनी रुम्सचा बिनदिक्कत ताबा मिळवला. काही ठिकाणी आतल्या कडया घातल्या गेल्यामुळे पुरुषांना आपोआप मज्जाव झाला. अर्धवट दाढी झालेला एक वऱ्हाडी ग्यालरीत बावचळून घोटाळत राहिला. दुसऱ्याची पँट घालून झाली होती आणि शर्ट घालणं बाकी होतं. तिसऱ्याचे कपडे बदलून झाले होते पण पादत्राणं आत अडकली होती. चौथ्या वऱ्हाडयानं ग्यालरीतच बॅग उघडून कपडे बदलले आणि कशीबशी भांगपट्टी केली. पाचवा वऱ्हाडी कमरेला टॉवेल गुंडाळून उघडयाबंब अवस्थेत दिशाहीन फिरत होता. नटून सजून तयार झालेल्या बायका आतल्या नटणाऱ्या सजणाऱ्या बायकांसाठी पहारा देऊ लागल्या. 'खबरदार जर टाच मारुनी येशील पुढती गडया, चिंधडया उडवीन राईराईएवढया' असा बायकांचा आवेश होता. हक्काच्या रुम्स बळकावल्या गेल्यामुळे ताटकळत हात चोळत चुळबुळण्याशिवाय वऱ्हाडी मंडळींना काही करता येण्यासारखं नव्हतं!

रुम नंबर ३२२ मधे महिपतराव वामकुक्षी आटोपून जागे झाले. त्यांनी सिगरेट शिलगावली तेवढयात बायकांचा थवा पाखरांसारखा आत शिरला. बोलबहादुर असलेले महिपतराव 'काही बोलायचे आहे पण बोलणार नाही'अशा भांबावल्या स्थितीत बाहेर पडले.

रुम नंबर ३४४ मधे हणमंतरावांना जाग आल्यावर पान खाण्याची हुक्की आली. तेवढयात बायकांची टोळधाड आत शिरली. चंचीचा सरंजाम आवरताना त्यांना पळता भुई थोडी झाली. 'पळा पळा कोण पुढे पळे तो.... 'अशा तडकाफडकीनं ते बॅगसह बाहेर पडले.

रुम नंबर ३६६ मधे संपतराव आळोखे पिळोखे देत उठले आणि टॉयलेटमधे नेटकेच जाऊन बसले. तिथे बायका मधमाशांसारख्या घुसल्या. कोणीही न दिसल्यामुळे 'कुणी नाही ग कुणी नाही आम्हाला पाहत बाई ' अशा निर्धास्तपणे बायकांचा साडया बदलण्याचा घोळ सुरु झाला. बाहेरची चाहूल लागताच संपतरावांचं अवसान गळालं. बराच वेळ ते तसेच बसून राहिले. 'जिना यहा.. मरना यहा.. इसके सिवा जाना कहा ?'असा प्रश्न त्यांना पडला. त्यांनी तोंडाभवती मफलर गुंडाळून त्यावर कानटोपी चढवली होती. ते घाबरत घुबरत टॉयलेटजवळच्या दालनात आले. तेवढयात दुसऱ्या दालनातल्या एकीला त्यांची चाहूल लागून त्यांचा अवतार दिसला. ती बाई किंचाळून बेशुद्ध पडली. इतर साळकाया माळकाया सैरावैरा धावून सैरभैर झाल्या! सगळया मंगल कार्यालयात घबराटीची लाट उसळली. त्यांच्यातल्या एका बाईनं

आपण याची देही याची डोळा 'दहशतवादी' पाहिल्याची याच वेळी आवई उठवली! पण या ठिणगीचा भडका उडण्याच्या आधीच संपतरावांनी मफलर कानटोपीचा जामानिमा कसाबसा बॅगेत भरला अन् ते रूमबाहेर पडण्याची तयारी करू लागले. तेवढयात महिपतराव आणि हणमंतराव संपतरावांच्या आश्रयाला येऊन पोचले! महिपतरावांनी कालच्या न्याहरीतला बॅगेतला कांदा काढून बाईंना हुंगवला. त्या शुद्धीवर येऊन लाजून पळून गेल्या! सगळी पळापळ धावपळ हळुहळू शांत झाली!! तळमजल्यावरनं सिक्युरिटी शिट्टी फुंकत आली आणि कानटोपी घातलेला दहशतवादी कुठे लपलाय का हे पहात पहात निघून गेली!

संपतरावांना घेऊन त्यांच्या बॅगेसह घेऊन महिपतराव आणि हणमंतराव दुसऱ्या मजल्यावरच्या सोपानरावांच्या रुम नंबर २११ जवळ आले. बंद दारासमोर सोपानराव खांद्यावर टॉवेल आणि बनियन अंडर पँट अशा अवतारात येरझारा मारत होते.

"अवो.. वरच्या मजल्यावर नाहक पळापळ सुरु झाल्ती.. आमी बारदाना घेऊन खाल्ती आलो बघा..." महिपतराव म्हणाले.

"लुगडं बदलणाऱ्या बायांनी आख्खा वरचा मजला काबीज केलाय जनू.. पन सोपानराव, तुमी काहून भाएर हुबे? नवरीबाईचे मामा ना तुमी ? आँ? " संपतरावांनी विचारलं.

" आता काय सांगू आन काय न्हाई...आमची घरवाली आर्ध्या घंटयापासनं लुगडं बदलून नखरा करुन राहिलीयं.. क्वा आटपंल तिचं त्ये काई ठावं न्हाई. तिकडं टाळीची येळ व्हईल आन मामाच्या नावानं बोंबाबोंब व्हईल तवाच ही भाएर येईल "

सोपानराव असं बोलत असताना त्यांची नटली सजली बाईल मोठया तोऱ्यात बाहेर पडली!!

सोपानरावासह महिपतराव,हणमंतराव आणि संपतराव रुम नंबर २११ मधे शिरले. महिपतरावांनी आत जाताच घट्ट कडी घातली आणि नवी सिगरेट शिलगावली. हणमंतरावांनी चंचीची गाठ सोडली. संपतरावांनी पुन्हा निवान्तपणे टॉयलेट गाठलं आणि मशेरी लावून सोपानरावांनी कडक इस्तरीचा झब्बा पायजमा परिधान केला.

तेवढयात रुमबाहेर उरल्यासुरल्या बायकांच्या नाजूक हातांच्या थापांचा आवाज चौघांना ऐकू येऊ लागला!

—आता वधुपक्षाच्या दुसऱ्या मजल्यावरही बायकांच्या आक्रमणाला जोमानं सुरुवात झाली होती !!!

oooooo

## ०८. पसायदान हे ...

**शे**वटी कुलकर्णीसाहेबांचा जीव भांडयात पडला.

होणार, होणार, म्हणून अनेक दिवस गाजत असलेला मंत्री महाशयांचा दौरा एकदाचा ठरला. शासकीय सुट्टयांची चंगळ असताना तारेवरची कसरत पार पाडावी ,त्याप्रमाणे कुलकर्णीसाहेबांनी संबंधित विभाग प्रमुखांची तातडीची सभा घेतली. तिच्यात पाटीलसाहेबांच्या मदतीनं त्यांनी कामाचं वाटप केलं. पोलीस खात्याकडनं आलेल्या सूचनांचा कागद त्यांच्या हातात होता. पाटीलसाहेबही खुशीत होते. दौऱ्याची पूर्व तयारी व्यवस्थित झाली. मंत्री महाशय ठीक बारा वाजता विश्राम गृहावर पोचणार होते. भोजनाची व्यवस्था आणि बेत पक्का झाला . विश्रांतीचा राखीव वेळ संपल्यावर दुपारी चार वाजता ते कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रयाण करणार होते. त्याप्रमाणे सुरक्षा व्यवस्थेची आखणी झाली.

कुलकर्णी आणि पाटीलसाहेबांनी अक्कलहुशारीनं कार्यक्रम पत्रिका तयार केली. अगदी मिनिट टू मिनिट कोणी काय करायचं हे पक्कं केलं. चार ते चार वाजून तीन मिनिटांपर्यंत दीप प्रज्वलन,पुढे पाच मिनिटांचं पाटीलसाहेबांचं प्रास्ताविक, सात मिनिटांचं पुष्पहार गुच्छ प्रदान, चोवीस मिनिटं स्थानिक वक्त्यांची भाषणं आणि छत्तीस मिनिटं मंत्री महाशयांच्या भाषणाला , पाच मिनिटांचं कुलकर्णीसाहेबांचं आभार प्रदर्शन असा कागदोपत्री कार्यक्रम ठरला.

दीप प्रज्वलनासाठी लागणारी समई घासून पुसून आणण्याची जबाबदारी जोशीसाहेबांनी पत्करली. शिर्डीहून मोटार सायकलवरनं हारगुच्छ आणण्यचं काम अहिरेसाहेबांनी स्वीकारल. फोटोग्राफर आणि लाऊडस्पीकरची व्यवस्था सोनवणेसाहेबांनी घेतली. टेबल खुर्च्या आणि बिछायतीच्या कामात निकमसाहेबांचा हातखंडा होता. जाधवसाहेबांनी स्वतःकडे सूत्र संचालन घेतलं. पूर्वतयारीच्या सभेत व्यासपीठावर टेबल खुर्च्या असाव्यात की लोडगाद्या असाव्यात यावर नेहमीप्रमाणे खल झाला. मंत्री महाशयांचा मुखडा सर्वांना म्हणून टेबल खुर्च्या असाव्यात असं पाटीलसाहेबांचं मत होतं तर गाद्यागिरद्या असल्या तरी लोडावर बसून मंत्री महाशय आपला मुखडा सर्वांना दाखविण्याच्या सवयीचे आहेत तेव्हा तो प्रश्नच नाही, असं जोशीसाहेबांचं मत पडल.

सर्वांना कामाचं वाटप झाल्यावर कुलकर्णीसाहेबांनी साहित्याची जमवाजमव करण्यासाठी यादी करायला घेतली. मंत्री महाशय सभास्थानी आल्यानंतर ओवाळणाऱ्या सुवासिनींनी घरुनच निरांजनं फुलवातींसह आणावीत असं ठरलं पण साळुंकेसाहेबांना हे पसंत पडलं नाही. एकसारखी तबकं व निरांजनं असावीत असं त्यांनी सुचवल्यावर कुलकर्णीसाहेबांनी लोटन शिपायाला बोलावल. त्याला पाच सारख्या आकाराची सुबक तबकं आणि ठसठशीत निरांजनं फुलवातीसह तयार ठेवायला फर्मावलं. त्याच वेळी त्यांना पसायदानाची आठवण झाली. कार्यक्रम पसायदानाने संपला म्हणजे सगळयांच्या मनावर सांस्कृतिक परिणाम होतो, काही तरी पवित्र, उदात्त, मंगलमय झाल्यासारखं वाटतं असं त्यांच्या डोक्यात तरळून गेल. त्याच क्षणी तडकाफडकी निर्णय घेऊन त्यांनी लोटनला पसायदानाचीही व्यवस्था करायला सांगीतली. त्यानं निमूटपणानं मान डोलवली. कुलकर्णीसाहेबांनी राष्ट्रगीता ऐवजी पसायदान लिहून कार्यक्रम पत्रिका टाईप करायला पाठवली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी लोटन घरी आला तेव्हा त्याची बायको त्रासिक चेहरा करून बसली होती. ती म्हणाली " अवो, एवढी ताटं आन आरत्या एका ठायी कशा गावतील ...त्या बी सराट सारख्या ...समद्यांनी मंगल कार्यालयात तपास कराया सुचिवल... आन त्ये पसायदान का फसायदान कुनाला ठावं न्हाई...!"

हे ऐकल्यावर लोटनला दिशा मिळाली. भांडीकुंडी भाडयाने देणारे घोडके कॉन्ट्रॅक्टर त्याच्या ओळखीचे होते. तो त्यांच्या भेटीला कार्यालयात जाऊन धडकला. तिथे सारख्या आकाराची तबकं निरांजनं धूळ खात पडली होती. ती त्यानं ताब्यात घेतली. तो त्यांना म्हणाला

“ अवो, त्ये पसायदान बी हवयं ...एक नग ...त्ये बी द्या...”

“ पसायदान माझ्याकडच्या सामानात नाही . त्याची येवस्था तू वायली कर...”

घोडके रजिस्टर मिटत म्हणाले.

“ आता त्ये कुटं गावल ?”

“माला कायी आयडीया न्हाई...त्ये तू भांडयाच्या दुकानात इचार ...बारकं भांडं आसलं ते ” घोडके म्हणाले.

दगडुशेठ कासारांनी लोटनचं स्वागत केलं. दुकानातली तऱ्हेतऱ्हेची भांडी न्याहळत लोटननं ‘ पसायदान आहे का ?’ असं विचारलं. ओठांचा चंबू करुन दगडूशेठांनी नकारार्थी मान हलवली. ओवाळणाऱ्या सुवासिनींना निरांजनासह ते हवं आहे त्याअर्थी तो दागिना असावा असं दगडूशेठ म्हणाले.

तबक निरांजनांची जडबदक पिशवी सांभाळत लोटन नथू सोनाराच्या दुकानात शिरला तेव्हा रात्रीचे आठ वाजले. पसायदान हा दागिना बायकांच्या गळयातला असावा असं त्याला वाटू लागलं. नथू सोनारानं त्याला पसायदानाचा घाट विचारला आणि पुढच्या हप्त्यात शहरात गेल्यावर त्याची चौकशी करीन असं आश्वासन दिलं.

बायकोनं लख्ख करुन ठेवलली तबकं आणि निरांजन घेऊन लोटन कुलकर्णीसाहेबांच्या घरी गेला. टो बाहेरगावी गेले होते. तो पाटीलसाहेबांच्या घरी पोचला. तबकं निरांजन पाहून ते प्रसन्न झाले. लोटननं हळूच पसायदानाचा विषय काढला. ते कुठल्याच दुकानात मिळत नसल्याचे सांगितल. पाटीलसाहेब उखडून म्हणाले “ पसायदान ही कुरकरनीसाहेबाची भानगड आहे. ती त्यांनाच विचारून निस्तर. ”

दिवसभर लोटन याला त्याला पसायदानाबाबत विचारत राहिला. सगळयांनी माना उंचावून, भुवया ताणून ही कोणती वस्तू असा भाव दाखवला. हिरेसाहेबांनी कापड दुकानात विचारायला सांगितल. चौरेसाहेबांनी कॅसेटवाल्याला विचारऱ्याचा सल्ला दिला. हा बंगाली खाद्य पदार्थ असावा आणि तबकात ठेवण्यासाठी कुलक र्णीसाहेबांनी आणायला सांगितला असावा असा अम्दाज ठोंबेसाहेबांनी बांधला. काहींच्या मते मूळ नांव चुक्त असावं , त्यामुळे तो मिळणं कठीण जातंय. काहींनी पसायदान मिळालं तर मुंबईलाच मिळेल असं अनमानधपके सांगून लोटनला गॅस वर चढवल.

तो रात्रभर तळमळत राहिला. अलीकडे त्यानं ज्युरॉसिक पार्क चित्रपट पाहिला होता. त्यातल्या डायनॉसॉरच्या रुपानं पसायदान त्याच्या भवती फेर धरत घुमत राहिलं.

कुलकर्णीसाहेब पहाटे घरी परतले. लोटन त्यांना भेटायला गेला. त्यांनी तबकं, निरांजनं पाहून समाधान व्यक्त केलं. डुपारचा कार्यक्रम यशस्वी होणार असं त्यांना वाटू लागलं.

लोटननं चाचरत चाचरत पसायदान मिळत नसल्याचं कसंबसं सांगितल . ते ऐंकल्यावर कुलकर्णीसाहेबांमधला साहेब जागा होऊन रागाचा पारा वाढू लागला. ते खेकसून म्हणाले,

“ अरे मूर्खा, तुला पसायदान माहीत नाही ? धन्य आहे तुझी ! जा पळ... संगीत मास्तर गवईबुवांच्या घरी... त्यांना माझा निरोप सांग. ते व्यवस्था करतील...पसायदानाची !”

पसायदान ही मिळू शकणारी वस्तू आहे हे समजताच लोटनला हायसं वाटल. तो लगबगीनं गवईमास्तरांच्या घरी पोहचला. निरोप सांगून तो म्हणाला

“ दुपारला चार वाजता कार्यक्रम आहे. ऐंन वक्ताला धावपळ नको... पसायदान घेऊन जायाला हवं तर मी रिक्षा आणतो. ”

लोटनचं बोलणं ऐकून गवईमास्तर जोरजोरानं हसू लागले. त्याच्याशी काहीही न बोलता त्यांनी त्याला रिक्षा आणायला पिटाळल. त्याच्या अंगात उत्साहचं वारं संचारलं. रिक्षात मावणारं पसायदान एकदाचं मिळालं याचा त्याला आनंद झाला.

रिक्षा आणल्यावर गवईमास्तरांनी लोटनला पेटी ,तबला, डग्गा, तंबोरा रिक्षात ठेवायला सांगितल.

“आणिक त्ये पसायदान कुटं ठिवायचं ” लोटनन चुळबुळत विचारलं.

“ ते फार नाजूकआहे... अवाढव्यही आहे. तुला ते जपून नेता येणार नाही. तू हे संगीत साहित्य घेऊन जा... मी दुपारी कार्यक्रमाच्या वेळी घेऊन येईल...काळजी करु नकोस!”गवईमास्तर चेष्टेच्या सुरात उत्तरले.

ठरल्याप्रमाणे मंत्रीमहाशयांचा कार्यक्रम मिनिट टू मिनिट सुरु झाला. फक्त साठेक मिनिटं इकडे तिकडे झाली ! चार दिवसांच्या दगदगीनं बसल्याजागी लोटनचा डोळा लागला ! त्याला अधूनमधून टाळयांचे आणि भाषणांचे आवाज ऐकू येत होते. बऱ्याच वेळानं त्याला जाग आली तेव्हा गवईमास्तर तालासुरात गात असल्याचं जाणवलं सभा आणि तिच्यातले सगळे लोक चित्रासारखे तटस्थ बसले होते. काहींनी भाविकतेन हात जोडले होते तर काहींनी गवईमास्तरांच्या सुरात सूर मिसळला होता.

लोटननं करकचून जांभई दिली आणि कुलकर्णीसाहेबांकडे पाहून ती आवरली .

गवईमास्तर आर्त सुरात गात होते :

***येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो***
***हा होईल दान पसावो***
***येऽणे वरेऽऽ ज्ञानदेवो***
***सुखिया ऽऽऽ जाला.***

हे ऐकता ऐकता लोटन आपल डोकं खाजवतच राहिला !!

oooooo **(महाराष्ट्र टाइम्स रविवार २३ जुलै १९९५ )**

## ०९. अशी ही श्रद्धांजलीची तऱ्हा...

**अ**रगडेसाहेबांचं बूड आज एका ठिकाणी स्थिरावत नव्हतं. साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा अगदी जवळ येऊन ठेपली होती. त्या आधीच्या पूर्वतयारीच्या कामांना चांगलाच वेग आला. सगळे विभाग युद्ध पातळीवर कामाला लागले . दिवस कसा उगवतो अन् मावळतो हेच अरगडेसाहेबांच्या कार्यालयाला समजेनासं झालं. जो तो आपल्या वाटयाचं काम उरकण्याच्या धडपडीत होता.

चेअरमनसाहेबांनी शक्य तितक्या लांबची तारीख वार्षिक सभेसाठी मुक्रर करायला सांगितली. कारण त्यांच्या प्रतिस्पर्ध्याची त्यांच्या पदावर वर्णी लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. ती ठरवताना गावातल्या एखाद्या चांगल्या ज्योतिषाशी सल्लामसलत करायला त्यांची सूचना होती. त्याबरहुकुम अरगडेसाहेबांनी चेअरमनसाहेबांची जन्मपत्रिका त्यांच्याकडे पाठवली. त्यांनीही मग तिचा अभ्यास करून, चंद्रबळ वगैरे तपासून तीन चार तारखा काढून दिल्या. त्या अरगडेसाहेबांनी  चेअरमनसाहेबांकडे लगोलग रवाना केल्या. ज्योतिषाची भरघोस दक्षिणा सादील खात्यात खर्ची टाकून अरगडे साहेबांनी स्वता नेऊन दिली. त्याच वेळी त्यांनी आपल्या मुलीच्या विवाहयोगाची सविस्तर चर्चाही केली. एका दगडात अनेक पक्षी मारण्याचं कसब त्यांना चांगलंच साधलं होतं.

चेअरमनसाहेबांनी आपल्या जवळच्या सहकाऱ्यांशी बरीच खलबतं करून विरोधकांना जास्तीत अडचणीची अन् गैरसोयीची होईल अशी एक  तारीख निवडली. ती निवडू नये म्हणून अरगडेसाहेबांनी  चेअरमन साहेबांना वारंवार सांगितलं. तेव्हा त्यांना 'दुसऱ्याची अडचण हीच आपली सुवर्णसंधी' असं मुत्सद्दी उत्तर ऐकायला मिळालं. चेअरमनसाहेब विरोधकांना खिंडीत गाठण्यात कमालीचे तरबेज होते. त्यांचं कावेबाज राजकारण भल्याभल्यांना वरकरणी उमजत नसे.

वार्षिकसभेची  तारीख मुक्रर होताच साखर कारखान्याची सगळी यंत्रणा अरगडेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली कामाला लागली. साखर कारखान्याच्या रिकाम्या गोदामात सभेची बैठक  व्यवस्था करण्याचा आतापर्यन्तचा प्रघात होता. चेअरमनसाहेबांनी तो मोडायचा ठरवलं. 'कोंदट जागेत बसल्यावर सभासदांच्या डोक्यातले विचारही कोंदट होतात. ' असं स्वरचित सुभाषित ऐकवून त्यांनी कारखान्यालगतच्या मैदानात खुला ,आलिशान मांडव उभारण्याचा घाट घातला. त्याचा ठेका चेअरमनसाहेबांच्या दूरच्या नातलगाला बिनबोभाट देण्यात आला. खुल्या मैदानाची साफसफाई करण्याची उस्तवारी अरगडेसाहेबांवर येऊन पडली. त्यांनी मर्जीतल्या स्थानिक ठेकेदाराला हे काम दिलं आणि मांडव ठेकेदाराशी संधान बांधून मुलीच्या लग्नाच्या वेळी तसलाच मांडव टाकण्याची तरतूद करुन ठेवली.

वार्षिकसभेसाठी तयार करायचा अहवाल ही अरगडेसाहेबांना नेहमीच तारेवरची कसरत वाटत आली. वीस वर्षा ंचा अनुभव गाठीशी असल्यामुळे सगळया अडीअडचणीतनं मार्ग कसा काढायचा हे त्यांना चांगलंच अवगत झालं होतं. जो मजकूर चेअरमन वाचणार, ज्याची जबाबदारी त्यांच्यावरच असणार त्याची लिखापढी अरगडेसाहेबांना करावी लागायची. ती करताना सध्याचे चेअरमन वाजवीपेक्षा जास्तच शाब्दीक  घासाघीस करायचे. प्रत्येक  वाक्याची माथेफोड करताना अरगडे साहेबांचा जीव मेताकुटीला येत असे. कोणीही आपल्याला बेसावध शब्दांनी पकडू नये म्हणून अरगडेसाहेब स्वताच दक्षता बाळगत. तसा मजकुराचा मसुदा ठराविक , निरूपद्रवी  अन् आगगाडीच्या रूळांसारखा गुळगुळीत झालेलाच असतो. सहकारक्षेत्रातल्या धुरिणांनी तो अक्कल हुशारीनं 'घडवला' आहे. अनेकदा तो सभेमधे न वाचताच मंजुरीला ठेवला जातो. सभासदांना वार्षिक  अहवाल आधीच रवाना केल्यामुळे तो सगळयांनी वाचलाच असणार अशी सोयिस्कर सबब

सांगितली जाते. उमेद्वारीच्या काळात अरगडेसाहेबांना या गोष्टीचं नवल वाटायचं. पुढे अनुभवानं अहवाल न वाचण्यातला बारकावा त्यांना उमगू लागला. कधी शब्दानं शब्द वाढतो, कधी संचालक मंडळाला अडचणीत पकडण्याचे डावपेच आखले जातात. अधनंमधनं एखाद्या वर्षी एखादा जागरूक सभासद अहवाल वाचायलाच लावतो अन् वादंगाला सुरूवात होते. वार्षिकसभेला कमीत कमी सभासदांनी यावं, खेळीमेळीच्या वातावरणात एकमेकांना ओरखडे न काढता, हसत खेळत यथेच्छ खात पित सभा पार पडावी अशीच अनेक संचालकमंडळांची सुप्त इच्छा असते. तरीही त्यांच्या मनसुब्यावर मात करणारे चिकित्सक, भांडखोर, कायदेबहादुर विरोधक असतातच हे देखील अरगडेसाहेबांनी गेल्या अनेक वर्षात अनुभवलं होतं.

अर्थविभागाकडनं नेहमीप्रमाणे वार्षिक जमाखर्च, ताळेबंद, अंदाज पत्रक आदी सामग्री अरगडेसाहेबांच्या टेबलावर येऊन पडली. तिच्या खोलात शिरण्याचं अरगडे साहेबांनी हळूहळू सोडून दिलं. सनदी लेखापालांनी अतिशय चातुर्यानं आकडयांची मांडामांड केलेली असते. सूचना देऊनही कोणीही सभासद आधी येऊन तपशीलवार माहिती घेत नाही. आयत्या वेळी एखाद्या 'शंकासुरा'नं एखादी शंका उकरून काढली तरी अर्थविभागाचे तरबेज अधिकारी कधी उडवाउडवीची तर कधी दिशाभूल करणारी हजरजबाबी उत्तरं द्यायला तत्पर असतात. आपली जबाबदारी आकडेवारी छापून घेताना एकही चूक राहू न देण्याची आहे, हे देखील अरगडेसाहेब अनुभवातनं शिकले.

वार्षिक अहवालात छापण्यासाठी शेकडो छायाचित्रं अरगडेसाहेबांच्या टेबलावर आली. ती निवडण्याचं काम तसं सोपं होतं. त्यांनी चेअरमन, व्हा. चेअरमन अन् मोजक्या संचालकांची ठळक छबी असलेली प्रासंगिक छायाचित्रं हातात ठेवून इतर लगेच हातावेगळी केली. अनेक संचालक वयोवृद्ध अन् गलितगात्र झाले तरी आपला तरुण वयातलं तरतरीत, पोरसवदे का असेना व्यक्तिगत छायाचित्र छापण्याचा आग्रह धरत. उमेद्वारीच्या काळात अरगडे साहेबांना या गोष्टीचं नवल वाटायचं. पुढे तेही आपलं तिशीतलंच छायाचित्र वापरू लागले. चेअरमनसाहेबांच्या फेटयाचा रंग अन् ढंग दरवर्षी बदलायचा ते तेवढं छायाचित्र नव्यानं छापावं लागायचं.

वार्षिक अहवालाची एवढी सगळी जमवाजमव अन् जुळवाजुळव झाल्यावर अरगडेसाहेबांनी प्रसन्न चित्तानं नेहमीच्या ठरलेल्या प्रेसवाल्याला फोन लावला आणि दुसऱ्या दिवशी सगळा मजकूर व छायाचित्रं घेऊन जायला बजावलं.

उमेदवारीच्या काळात अरगडे साहेब श्रद्धांजलीचं पान नामवंत दिवंगतांच्या नाव व हुद्यानिशी तपशीलवार यादीनं सजवायचे. परिवारातल्या ठळक दिवंगत व्यक्तींची नोंदही तत्परतेनं घ्यायचे. त्यात एखाद दुसऱ्या सुटून गेलेल्या नावामुळे वार्षिक सभेत दिलगिरी व्यक्त करण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली. तेव्हापासनं त्यांनी ' एक दोन वाक्यांच्या श्रद्धांजली' चा सोपा, सुटसुटीत, निरुपद्रवी तर्जुमा स्वीकारला. त्याला अनुसरून प्रतिवर्षाप्रमाणे हातात पेन घेऊन त्यांनी समोरच्या कोऱ्या कागदावर श्रद्धांजलीचा ठरलेला मजकूर लिहिला,

*" अहवाल वर्षात कला, क्रीडा, साहित्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील आणि संचालक मंडळ व कारखाना परिवारातील ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचं निधन झाले. त्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर मृतांच्या आत्म्यांना शान्ती आणि सद्गती देवो!! "*

हे वाक्य लिहून झाल्यावर अरगडेसाहेबांना बॉलपेनची रिफील काढून मोडून टाकण्याचा मोह झाला. चित्रपटांमधे न्यायाधीश फाशीची शिक्षा दिल्यावर टाकाची निफ मोडून टाकतात हे त्यांनी अनेकदा पाहिलं होतं.

अरगडेसाहेब आपल्या आलिशान खुर्चीत मागे मान रेलून निवांत झाले तेवढयात चेअरमनसाहेबांचा फोन खणखणला,

" हॅलो, अरगडे .... वार्षिक अहवालाची हालहवाल काय हाय?"

“ अहवाल पूर्ण झाला साहेब.. आत्ताच श्रद्धांजलीचा मजकूर लिहिला... उद्याला प्रेसला जाईल. ”

“ हां...त्या श्रद्धांजलीच्या पानासाटीच आमी तुमाला फोन लावला.. ती तुमची पेटंट लाईन या वर्षापासनं छापणं बंद करा म्हनतो आमी.. ”।

“ का.. हो... का नको ?... साधा औपचारिक मजकूर असतो तो श्रद्धांजलीचा... ”

“ हां...तेच तर म्हनतोय आमी...आसं मोघम नको... सगळीकडच्या मेलेल्या मानसांची ठळक ठळक नावांची यादी करा आन ती छापा...आता आमच्याच फ्यामिलीत माझे सासरे गेले, मावस सासूबाई गेल्या आन थोरल्या मुलाचे व्याही पन गेले...सगळेच पॉवरमधे होते...त्यांची नावं घ्या आन कारखान्यात बी ज्याच्या घरी मयत झाली असंल त्यांची बी नावं येऊ द्या... समजलं? ..आशी यादी झाली की आमच्याकडं पाटवा.. कोनी बी राहून जायला नको म्हनून! ”

दालन वातानुकुलीत असूनही अरगडेसाहेबांना अचानक घाम फुटला...ज्या बॉलपेनची रिफील त्यांना मोडून टाकाविशी वाटत होती ती आपण गिळून टाकावी असं त्यांना वाटू लागलं.

जरा वेळानं डोकं शांत झाल्यावर अरगडेसाहेबांनी स्वीय सचिवाला बोलावून संध्याकाळी पाच वाजता सगळया विभागप्रमुखांची तातडीची सभा आयोजित करायला सांगितली. फोनवरनं चेअरमनसाहेबांना तिला हजर राहण्याची विनंती केली.

दिवसभर अरगडेसाहेबांनी एवढया तातडीची सभा कशासाठी बोलावली असेल याचीच सर्व विभागांमधे खमंग चर्चा होत राहिली. कोणाला काहीच उलगडा होत नव्हता. वार्षिकसभेनंतर होणाऱ्या भोजनाचा मेनू ठरवण्यासाठी सभा असेल असं काहींना वाटलं तर काहींना दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूबाबत सल्लामसलत होईल असं वाटलं.

बरोबर पाचाच्या ठोक्याला चेअरमनसाहेबांची आलिशान गाडी कारखान्याच्या आवारात शिरली. वेगवेगळया विभागातल्या सलाम्या घेत ते सभागृहात पोचले. अरगडेसाहेबांनी त्यांचं स्वागत केलं आणि सभेला रीतसर सुरूवात झाली.

“ आता आपण श्रद्धांजलीच्या पानासाठी इथं एकत्र जमलो आहोत. हे पान आपल्या वार्षिक अहवालात घालायचं आहे. अहवाल वर्षात कला, क्रीडा, साहित्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात आणि संचालक मंडळ व कारखाना परिवारात ज्या ज्ञात अज्ञात माणसांची मयत झाली. त्या सर्वांना श्रद्धांजली वाहण्यासाठी त्यांची सगळी यादी छापायची ठरलं आहे. तेव्हा, कला, क्रीडा, साहित्य क्षेत्रातली जी माणसं दिवंगत झाली आसतील त्यांची कापरेसाहेबांनी करावी.... ”

अरगडेसाहेबांचं बोलणं एकाग्र चित्तानं ऐकणारे कापरेसाहेब आपलं नाव ऐकताच उत्तेजित झाले.

ते म्हणाले,

“ तसा आता माझा कला, क्रीडा, साहित्य क्षेत्राशी संबंध उरलाच नाही इथल्या कामांच्या धबडग्यात.. पण ठीक आहे मी करतो. यादी फक्त म्हाराष्ट्रापुरतीच करायची ना ? ”

“ हो.. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राची जबाबदारी मी पाटीलसाहेबांवर सोपवतो. ”

आपलं नाव ऐकून पाटीलसाहेब दचकले. ते म्हणाले,

“ चालंल की.. राजकीय क्षेत्राची माला खडा न् खडा माहिती आहे. पण ते.. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राचं ओ का ठो कळत नाही आपल्याला. तेव्हा.. ”

" ठीक हाये... या साली आपन राजकीय क्षेत्रावर जोर देऊ.. पुढच्या सालाला सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राचं बगू. हां, ही घ्या आमी केलेली यादी पाटीलसायेब.. ही नावं ॲड करा तिच्यात. "

चेअरमनसाहेबांनी जाकिटातनं आणलेली पाकिटातली यादी त्यांच्या हातात दिली. पाटीलसाहेबांनी ती व्यासपीठावर जाऊन बक्षिस घ्यावं तशी घेतली. एक दोनजणांनी टाळया अभावितपणानं वाजवल्या. त्यांनीही चेअरमन साहेबांना अन् सगळयांना नमस्कार केला स्वाभाविकपणानं.

" आता आपलं पुढचं काम.. " अरगडेसाहेब उत्साहित होऊन बोलू लागले, " आपल्या कारखाना परिवारात अधिकाऱ्यांपासनं शिपायांपर्यन्त ज्यांच्या घरात मयत झाली असंल त्यांची नावं गोळा करायची आहे. जोशीसाहेब, तुमी लिहून घ्या ,चटचट.. "

डुलकी घेणारे जोशीसाहेब सावध झाले आणि पटापट लिहू लागले.

" माझा साडूभाऊ खलास झाले...मागल्या महिन्यात...राजकारनात होते ते...माजी सरपंच घ्या त्यांचं नाव.. " असं म्हणून दस्तुरखुद अरगडेसाहेबांनीच खिशातला कागद जोशीसाहेबांकडे सरकवला.

" साडूभाऊ कायला हो साडूच म्हना की.. " चेअरमनसाहेब तारस्वरात म्हणाले.

" साडूभाऊच बरोबर आहे. मोरोपन्तानी एका आर्येत म्हटलंय.. 'साडू न तू उलटा ऊभा...'असं. तेव्हा उलटा भाऊ म्हणजे साडूच की हो..."

कापरेसाहेबांचं हे स्पष्टीकरण बहुतेकांच्या डोक्यावरनं गेलं!

" माझी चुलत सासू गेल्याच महिन्यात गचकली...ग्रामसेविका होती ती..." नागडेसाहेबांनी तिच्या नावाची चिठ्ठी जोशीसाहेबांना दिली.

" माझा दुदभाऊ...गेला अपघातात.. "

"दुदभाऊ.. म्हनजे कोनता भाऊ.. ?" चेअरमनसाहेबांनी तारस्वरात विचारलं.

" म्हनजे तो जनमला तवा त्याच्या आईला दूद नव्हतं. तो माज्या आईच्या दुदावर ल्हानाचा मोटा झाला.. म्हनून दुदभाऊ.. " हेगडेसाहेबांनी खुलासा केला.

हे ऐकून चेअरमनसाहेबांनी अन् अरगडेसाहेबांनी डोक्याला हात लावला!

" माझा पुतन्या..."

" माझी भावजई..."

" माझा भाचा..."

" माझी भईन.... "

" माज्या नंदेचा न्हवरा.. "

" माझा आजला.. "

अशी मयतांच्या नावांची अन् नात्यांची सरबत्ती सभागृहाच्या काना कोपऱ्यातनं सुरू झाली. काहींनी चिठ्ठयांवर नावं लिहून ती जोशीसाहेबांना नेऊन द्यायचा सपाटा चालवला!

व्यासपीठावर चेअरमनसाहेब अन् अरगडेसाहेब डोक्याला हात लावून बसून राहिले.

शेवटी सभागृहातला कल्ला थांबवत चेअरमनसाहेब उठून उभे राहिले अन् म्हणाले,

" हे बगा.. तुमच्या सगळयांच्या भावना आमाला समजल्या. इथं ज्या चिठ्ठया गोळा झाल्या त्या कोनत्या घ्यायच्या आन् कोनत्या सोडून द्यायच्या याचा निनर्य अरगडे साहेब आपल्या कप्यासिटीत पुढल्या वर्षी घेतील. यावर्षी मात्र मागलंच वाक्य कायम राहील. अरगडेसाहेब आता आपल्याला त्ये वाचून दाकवतील..."

अरगडेसाहेब हलकंसं स्मितहास्य करत उठले. 'माझ्या मनी जे जे होते ते ते दिले भगवंते ' ही अभंगाची पुटपुटत त्यांनी सकाळपासनं जपून ठेवलेला कागद काढला अन त्यातलं ते सर्वसमावेशक ,निरूपद्रवी वाक्य सभेला पुन्हा वाचून दाखवलं,

*" अहवाल वर्षात कला, क्रीडा, साहित्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील आणि संचालक मंडळ व कारखाना परिवारातील ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचं निधन झाले. त्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर मृतांच्या आत्म्यांना शान्ती आणि सद्गती देवो!! "*

हे वाक्य वाचून होताच चेअरमनसाहेबांसह सगळे उठून उभे राहिले आणि सगळयांनी पाच मिनिटं स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहिली.

कारण चेअरमन साहेबांनी आपल्या मनगटावरचं घडयाळ एकटक पाहात पाच मिनिटं स्तब्धता पाळली होती !

"आता जी श्रद्धांजली वाचून झाली तीच छापून पुन्हा श्रद्धांजली म्हणून वार्षिकसभेत दिली जाईल. याची सगळयांनी नोंद घ्यावी.... "

अरगडेसाहेब वरकरणी गंभीर पण मनातनं मिश्किल होत तारस्वरात म्हणाले!

चेअरमनसाहेबांसह आता कुणालाही कुरकुरायला जागाच उरली नाही 'हलवून खुंटा बळकट' झाल्याचं सात्त्विक समाधान त्यांच्या चर्येवर तरळून गेलं.

oooooo

## १०. जिवन्त भुताची कथा

**वा**ऱ्यानं भिन्नाट ताल धरताच हातातलं भिरभिरं फिरू लागल्यागत नाथा जोगाईच्या देवळातनं बाहेर पडला. आसमन्तात अंधाराचं सावट पसरू लागलं. हातापलीकडचं चक्क दिसत होतं अन् दोन हाकेवरचं माणूस थबकावं इतकी शांतता पसरली होती. नाही म्हणायला वाटेलगतच्या शेतांतनं मोटकऱ्यांच्या मोटा अखेरचं पाणी शिम्पत होत्या. त्यांचा कुर्र ऽऽकीर्रर्र ऽऽऽ आवाज सगळीकडे घुमत होता.

नाथा देवळातनं बाहेर पडता पडता जरा थबकून ,मागे वळून म्हणाला,

" ए.. शंकऱ्या .. ध्यान ठिव तू बाबाकडं...मी गावात जाऊन आलुच बघ..."

आपली हाफ पॅण्ट वर करत शंकऱ्या जेव्हा " व्हय व्हय " म्हणाला तेव्हा नाथाच्या पायांनी सपाटून वेग घेतला.

हिरवी रानवट मागे पडली अन् गावातल्या घरांच्या ओळी नाथाला दिसू लागल्या. गावचा आठवडे बाजार अर्धा अधिक उठला होता. उरलेला भाजीपाला स्वस्त भावातही घ्यायला गिऱ्हाईकं तयार होत नव्हती. ग्रामपंचायतीचे दिवे अंधुक प्रकाश देऊ लागली.

नाथाला पळताना पाहून जाणारी येणारी माणसं त्याच्याकडे थबकून पाहात असत अन् 'हं.. वल्ली आहे झालं ' असं पुटपुटत निघून जात. त्याचा धांदरट स्वभाव साऱ्या गावाला माहीत होता. समोरनं हैबतराव अन् महिपतराव येत होते. दोघांनी नाथाच्या बखोटीला पकडून कसंबसं थांबवलं. त्याच्या धापाकडे बघत हैबतरावांनी विचारलं,

"आरं काय रं.. नाथ्या... कसली येवढी घाई चाललीय.... आसा काय पळतूस वाग पाठी लागल्यावानी?"

पाटलाच्या घराकडे बघत नाथानं दम घेतला अन् कसंबसं म्हणाला,

" काय नाय जी...चाला की पाटलाच्या घरला सांगतूच सारं. "

महिपतराव त्याच्याकडे बघून हसले. हातातली बिडी पायाखाली चिरडत म्हणाले,

"पक्की नेभळट वल्ली हाय गावातली...काई दिसलं की त्येच घेऊन पळतुय... मागं येक्दा यानं शेतात लष्कराचं हेलीकाप्टर पाईलं... त्ये काय करतं हये पाहन्यापरीस हा पाटलाच्या घराला र.. वा.. ना !"

नाथा तडक पाटलाच्या घरात शिरला. राधाक्का चुलीजवळ भाकरीचं पीठ मळून भाकऱ्या थापत होती. चुलीवर कालवणासाठी टाकलेली फोडणी आवाज करत तडतडत होती. पलीकडचा भात स्टेशनात उभ्या रेल्वे इंजिनासारखा फुस्स आवाज करत धापा टाकत होता.

नाथानं राधाक्कासमोर मधल्या खांबाला टेकून बसकण मारली. बोलण्यात केविलवाणेपणा आणत तो राधाक्काला म्हणाला,

" आक्का ग...आपल्या बाबाचं काई खरं न्हाई.. "

तो गुडघ्यात मान घालून मुसूमुसू लागताच घरातली माणसं, लेकीसुना, नोकरचाकर बावरले अन् त्याच्याभवती गोळा झाले.

" नाथ्या आसं काय जालं रं बाबा.. " असं म्हणत राधाक्का त्याच्याजवळ सरकल्या.

“ आटोपला आसंल कारबार.. ” कोणालाही ऐकू न जाईल अशा बेतानं नाथा मान वर न करताच पुटपुटला.

राधाक्काची नव्या शेतावरनं आलेली मुलं पागोटी खुंटीला टांगून त्याच्याजवळ येऊन बसली.

थोरल्या विश्वनाथानं त्याच्याकडे बघत विचारलं,

“ आरं, आसं रडतुस काय बायल्यावानी.. काय घडलं त्ये बैजवार सांग की लेका.. म्हनजी आमी बी रडाया मोकळं व्हवू की.. ”

नाथा डोळे पुसत म्हणाला,

“ पानी द्या अगुदर.. ”

कोणीतरी आणून दिलेलं पाणी एका दमात संपवत नाथानं तोंड पुसलं अन् म्हणाला,

“ आज दुपारच्याला बाबानं माला सांगावा धाडला...”

हा आता नमनालाच घडाभर तेल जाळणार हे ओळखून मधला रघुनाथ त्याच्यावर खेकसला,

“ आरं काय घडलं त्ये सरळ सरळ सांग अगुदर.. ”

“तवा मी आपल्या जुन्या शेतातनं बैलगाडी जुपून बाबाला घिऊन ग्येलो तिथं.. बाबा म्हनला, माला पाय मोकळं करायचं म्हनून त्याला म्या आन् शंक्यानं उचलून जोगाईच्या देवळात न्येलं. मनाशी म्हनलं, म्हतारं मानूस आन् बिमार.. बाबाची ईच्छा कायला आखडा.. ”

धाक्टा बाळनाथ पुन्हा त्याच्यावर खेकसला,

“ फटाफटा सांग की लेका...बाबा गचकला का एकदाचा?”

हे ऐकून राधाक्कानं एकदम रडायला सुरूवात केली. कोणीतरी आणून दिलेलं पाणी पिऊन हुंदके देऊ लागली.

“ न्हाई.. न्हाई.. धुगधुगी आसंल नव्ह आजून...शंक्या हाय ना तितं. ”

“ हरामखोरा, तू त काई केलं नाही ना बाबाला.. ” विश्वनाथ दरडावणीच्या सुरात ओरडला.

“ न्हाई...म्या फक्स्त माजी चिलीम वढायला दिली बाबाला... आकरी ईच्छा मानून.. ”

नाथा हलक्या आवाजात म्हणाला.

“ माज्या...दादानं आखरी चिलमच वढली व माय ...” राधाक्कानं तारस्वर लावला.

“ व्हय.. बाबा जोगाईदेवी म्होरं गेला.. पाया पडला... आन भायेर यिऊन टेक्ला...माज्या हातची चिलीम घिऊन म्हनला, ‘नाथ्या, दोन चार झुरके माला बी वढू दये.. ’म्या मनाशी म्हनलं, म्हतारं मानूस आन् बिमार.. बाबाची ई च्छा कायला आखडा.. ’ बाबानं चार दोन झुरके वढले आन साफ आडवाच जाला जोगाईदेवी म्होरं.... ”

एव्हाना शेजार पाजरच्या बायका जत्रेगत पाटलाच्या घरात जमा झाल्या. फोडणीचा जळका अन् भाताचा करपट वास घरभर दरवळू लागला. कोणी तरी फोडणीचं रिकामं अन् भाताचं भरलेलं पातेलं खाली उतरुन ठेवलं. मिळून सगळया बायकांनी रडण्याचा पंचम सूर लावला. राधाक्कानं रडणं आवरतं घेऊन नाथाला विचारलं,

“रांडेच्या.. येवस्तित पाह्यलं का? का.. आला तसाच धावत पळत.. ” तिला आपल्या भावाला चिलीम ओढण्याची हुक्की यायची हे माहित होतं.

“आता काय आन कसं सांगू तुम्हास्नी राधाक्का... ” नाथा बोलता झाला. “ सगळयात पहिले म्या नाडी बगीतली.. लईच मंद.. जवळ जवळ नाईच...डोळं आन छाती बी पायली... ती थंडच व्हत हुती...आता माजं काई चुक्लं आसंल तर उचला ती पायतान हाना माला.. ”

गांभिर्याला वेगळं वळण लागू नये म्हणून विश्वनाथानं नाथाला चुचकारत त्याची पाठ थोपटली.

बाबा पाटील गावातलं जुनं प्रस्थ होतं. चिक्कार शेतीवाडी अन् धनदौलतीचा धनी. दोन वेळी संसार मांडला तरी निपुत्रिकाचा शाप कपाळावर कायम राहिला. दुसरं कुटूंब वारल्यावर बाबा पाटलानं आपल्या बहिणीला, राधाक्काला तिच्या तिन्ही मुलांसह आश्रय दिला. कोणालाही दत्तक घेण्याच्या भानगडीत तो पडला नाही. त्याच्या तामसी स्वभावामुळे तिन्ही मुलं त्याला वचकून असत. राधाक्कालाही आपली हकालपट्टी होण्याची भीती सतावत असे. त्यानं मृत्युपत्र करून ते कोणाला तरी सांभाळायला देऊन ठेवलं असणार अशी सगळयांना शंका येत असे. त्याला त्याबाबत विचारण्याची कोणाचीही टाप नव्हती. त्याला नीट वागवलं नाही तर तो असलेलं किंवा नसलेलं मृत्युपत्र बदलण्याचा खटाटोप म्हणा,उपद्व्याप म्हणा करेल अशीच सगळयांना धास्ती वाटायची. त्याच्या तामसी स्वभावाला पाताळयंत्रीपणाची पहिल्यापासनं जोड होती. उतारवयात त्याची दम्याबरोबर संशयी वृत्ती वाढत गेली. नुकताच आजारपणातनं उठल्यामुळे त्याची जगण्याची वखवख चरचरणाऱ्या जखमेप्रमाणे इतरांना तापदायक ठरू लागली. दिसेल त्याच्यावर डाफरणं, रात्रीबेरात्री उठून इतरांना जागवणं, कशाचाही हट्ट धरणं असल्या त्याच्या वागण्याला घरातले सगळे कंटाळले.

“ तवा आसं जालं न्हवं...” मधल्या रघुनाथानं सुस्कारा सोडण्याचा आव आणला.

“ व्हय.... बाबा पाटलाला आता वाडयावर आणावं लागंल.. त्यानंच हुबा केला हा बारदाना.. ”

“ सोयऱ्या धायऱ्यांना रातोरात सांगावा धाडावा लागंल.... लईच झ्याक मरन आलं बाबाला. ”

“ मयताचं सामान गोळा करावं लागंल. परान बी सोडला तो जोगाईच्या साक्शीनं.. ”

वृद्ध ग्रामस्थ मंडळी आपसात बोलू लागली.

“ बाबाला आनाया दनकट बाजलं घ्या...सकाळच्याला त्यावर अंगोळ व्हईल त्याची...तुळशीपत्र आन गंगाजलाचा गडू बी आसू द्या.... भजनी मंडळाला सांगावा धाडा...”

अशी सगळी तयारी करून विश्वनाथ, रघुनाथ, बाळनाथ, नाथा आणि दहा वीस गावकरी जोगाईच्या देवळाकडे निघाले तेव्हा चांगलाच अंधार पसरला. पुढे चालणाऱ्यांच्या हातात एक गॅसबत्ती अन् मागे दोन चार कंदील होते.

जोगाई देवीचा बाग ओलांडून मुख्य मंडळी ओटयावर चढली. तिथं एका कोपऱ्यात शंकर थरथरत उभा होता. विश्वनाथ पुढे झाला. त्यानं आपला हात बाबा पाटलाच्या मिशाळ नाकाजवळ नेला अन् नकारार्थी मान हलवली. एका म्हाताऱ्या गावकऱ्यानं नाडी हातात घेत म्हटलं,

“ वाईच धुगधुगी हाय.. पन बाबा शान्तच व्हईल तासा दोन तासात... आंग लईच थंड पडलंय बाबाचं.. ”

“ गंगाजल, तुळशीपत्र, मांडी देनं आपन वाडयावरती करू.. आता आपन निघू म्हाताऱ्याला धिऊन. ”

“ हं...चला, मंडळी ठिवा बाजल्यावर आन धिऊन चाला गावाकडं...बाबाच्या नशिबात आसं देवीच्या म्होरं आसं आपसूक मरन लिव्हलं व्हतं म्हनायचं.. चला बिगी बिगी.. ”

चार माणसं पुढे सरसावली. त्यांनी बाबाला टांगाटोळी करून बाजेवर निजवलं आणि बाबा पाटील चक्क उठून बसला! सगळे दोन हात मागे सरकले. गॅसबत्ती धरणारा अचानक कलंडला आणि ती घरंगळत जाऊन फुऽ ऽ स्स ऽऽ आवाज करत विझून गेली. दोन चार कंदील धरणारे पकड बळकट करत बाबा पाटलाचं उठून बसणं टकमक पाहू लागले. विश्वनाथ, रघुनाथ, बाळनाथ, नाथा आणि दहा वीस गावकऱ्यांची भीतीनं गाळण उडाली.

आपल्याला बाजल्यावर निजवलं आहे अन् अवतीभवतीची सगळी मंडळी बोडकी आहेत यावरनं चलाख बाबानं काय प्रकार आहे हे लगेच ताडलं. बसल्या जागेवरनं तो संतापानं खेकसला,

" माला वाटी लावाया आला जनू... म्या मेलो म्हनून...पर ध्यानात ठिवा आजून मी जित्ता हाय... लागलीच मरनार न्हाई..... इस्टेटीवर डोळा हाय भडव्यांचा..."

थोरला विश्वनाथ, मधला रघुनाथ अन् धाकटा बाळनाथ खालमानेनं ऐकत होते.

एकदम काही तरी आठवून बाबा पाटील पुन्हा खेकसला,

" आन तो हरामखोर नाथ्या कुटं हाय...ना ऽऽथ्या.. "

सगळेजण दोन हात मागे सरकले अन् नाथा एकदम तोफेच्या तोंडी आला. तिकडे शंकरची थरथर थांबली होती अन् इकडे नाथाची थरथर सुरू झाली होती.

" भडव्या... काय रं...चिलमीत गांजा घालतूस व्हय? ...चक्कर यिऊन बेसुद जालो तर म्येलो का काय रं मी ? आं ऽऽऽऽ"

बोलता बोलता बाबा पाटील पुन्हा बाजेवरती कलंडला. इतका वेळ दातखीळ बसल्यासारखा गप्प असलेला नाथा पुढे वाकून अभावितपणे म्हणाला," अवो.... पुना म्येला वाटतं बाबा.. "

कोणीतरी त्याला दटावत म्हणालं,

" ए ... नाथ्या... बाबा म्येला नव्हं.... त्याचं भूत बी जालं नव्हं.... पन त्ये..... "

" पन त्ये काय..." चारजणांपैकी एकानं बाबा पाटलाचं बाजलं पेलत विचारलं,

" त्ये आता जिवन्त भूत झालेलं हाय !"

सगळे हसले आणि गावाच्या वाटेला लागले.

मानगुटीवर कायम बसलेलं बाबा पाटलाचं जिवन्त भूत खांद्यावर पेलवत गावाचे पाय उचलू लागले!

oooooo **( जागृती दिवाळी अंक १९६९ )**

## ११. गाडयांचा ताफा गेला..

**आ**ठवडयाचा बाजार आटोपून, भरपेट जेवण करून भोजू चावडीच्या दिशेनं निघाला. तिथं नेहमी गप्पा मारणारं टोळकं जमू लागलं . बाजीराव,रंगराव, जोशीगुरूजी, नामाटेलर आदी मंडळी आधीच आली होती. चावडीच्या आसपासच्या ओटयांवर छोटे मोठे घोळके नेहमीप्रमाणे गप्पा छाटत बसले होते. भोजू दिसताच बाजीरावाला स्फुरण आलं. त्यानं विचारलं,

“ ये भोजू ये...काय समजली शहरातली नवी खबरबात.... ? ”

“ काई नई भाऊ.... तिकडं येकच चर्चा चालू हाय.. ”

“ चर्चा ?कायची ?”रंगरावानं कान टवकारले.

“ लई लांबनं म्हनजी लंडनवरनं गाडया येनार हायीत म्हनं. ”

“ गाडया... आन त्या लंडनवरनं...त्यात नवीन काय हाय?”

“ आरं आपलं गावच हाय आग्रारोडला लागून.... हमेशा दिसत्यातच ना गाडया ...कधी दिल्लीच्या तर कधी मद्रासच्या. त्यात काय नवल नाय भाऊ...”

आपला गावाबाहेरचा पेट्रोल पम्प बंद करून ,जेवण करुन सदाशिव चावडीवर येऊन पोचला.

“ या पेट्रोलकर या...” सदाशिवाला गावाला हे नवं नाव बऱ्याच दिवसापासनं बहाल केलं.

“ तुम्हाला कळलंच आसंल...गाडयांच्या जागतिक स्पर्धेविषयी.. ”

“ हां.. म्हादेवनं बातमी आणली.... पन तिचा गावाशी काय संबंध ?”

“आसं कसं.. आग्रारोडवर, महामार्गावरलं आपलं महत्त्वाचं गाव.. गाडयांची शर्यत पाह्यला मिळंल हे गावचं भाग्य नाई का ?” इतका वेळ काहीच न बोललेले पाटील म्हणाले.

पाटील बोलू लागलेले पाहून आसपासच्या ओटयांवर छोटेमोठे घोळके कुतुहलानं त्यांच्याभवती गोळा झाले. जणू अनधिकृत ग्रामसभाच सुरू झाली.

“ का वो.. पाटील.. येक शंका हाय.. ”मॅट्रिकच्या वर्गात शिकणारा ज्ञानोबा म्हणाला, “आता ही शर्यत...बैलगाडयांची नाही गाडयांची ... तेवा सगळया गाडया येकाच वेळी आग्रारोडवरनं कशा धावतील? त्यांच्या येकमेकांना खेटून खेटून टकरी नाही का होनार.. ”

“ आरं... ज्ञान्या .. ही जागतिक शर्यत हाय...तिचे नियम येगळे आसतात.... सगळया गाडया आपल्या समोरनं सुसाट वेगानं येका पाटोपाट जातील...त्यांचं टायमिंग नाशिकला चेक व्हईल...पुढं मम्बईत्याआधी इंदूर, धुळं, मालेगावला आसंच टायमिंग चेक जालेलं आसंल .... आसं करत करत त्यातनं पहिला दुसरा नम्बर काढतील...” सदाशिव पेट्रोलकरनं माहिती पुरवली.

“ आशी भानगड राहती का.. आमाला वाटलं लंडनवरनंच सगळया गाडया येकाच वेळी सोडल्या आसतील.. आपल्या बैलगाडयांच्या शर्यतीवानी...” ज्ञानोबाचा मित्र तुकोबा निरागसपणानं म्हणाला.

जागतिक कार रॅलीची अशी जुजबी माहिती कळल्यावर पाटलांचं उपजत पुढारपण जागं झालं. त्यांना उत्साहाचं भरतं आलं. या निमित्तानं आपल्याला मिरवता येईल, पेपरात नाव छापून येईल असा मनाशी विचार करून ते म्हणाले,

“ या गाडया आपल्या गाववरनं क्वा पास व्हनार हायेत भोजू ?”

“ येत्या आईतवारी.. सकाळी दहा वाजेपासनं.... ”

“ हये ब्येस जालं.... मध्यान राती जात्या काय बी करता आलं नसतं.... ”

“ म्हनजी ...आपल्याला काय कराच्चं ? ”

“ आरं गावाकडनं .. स्वागत नको का कराया... जानाऱ्या गाडयांचं...गाडीवाल्या डायवरांचं...”

“ अवो... पाटील.. गाडया आपल्यासाटी थांबनार हाईत थोडयाच .. ”

“ न का थांबेनात...पन आपली संक्रुती काय म्हनते.... ”

“ आतिथी देवो भव. ” जोशीगुरुजी अभावितपणे बोलले.

“ बराबर.. तवा आता काय काय करता येईल आन कोनी कोनी काय कराच्चं त्ये ठरवून टाकू.. ”

पाटलांचं बोलणं ऐकून काहींनी कान टवकारले. काही सटकले. कारण हे कारण सांगून ते देणगी जाहीर करायला भाग पाडतील. नंतर ती वसूल करतील असा काहींचा अनुभव होता.

“ पहिल्यांदा आग्रारोडवर स्वागताच्या कमानी हुभाराव्या लागतील. त्याच्यावरती ‘ वे ऽ ल ऽ क ऽम ’ आसं विंग्रजीत रंगवून घ्यावं लागंल.. ”

“ लई ब्येस... त्यासाटी माजी देनगी...” पाटील बोलू लागताच सरपंच त्यांना अडवून म्हणाले,

“ नाई.. पाटील.. हा खर्च ग्रामपंचायत करंल...”

सरपंचानं आपली देणगीतनं अलगद सुटका केल्यानं पाटील मनातनं खुश झाले.

“ फलकाचं कापड रतनशेटनं फुक्ट दिलं तर मी ते फुक्ट शिवून देईल.. ”नामा टेलर म्हणाला. असे डाव टाकायला तो तरबेज होता. रतनशेटला आढेवेढे घेऊन हो म्हणावं लागलं.

फलकावर इंग्रजी मजकूर लिहिण्यासाठी तालुक्याला जाऊन तिथल्या कॉलेजातल्या एखाद्या प्राध्यापकाची मदत घ्यायचं ठरलं. ही जबाबदारी कुलकर्णीमास्तरांनी घेतली.

“ वेलकमच्या स्पेलिंगवर लक्ष ठेवा... Wel come असंच हवं. नाही तर Well come असं झालं तर फॉरीनच्या ड्रायवरांना वाटंल आपल्याला विहिरीत यायलाच बोलावताहेत !” बी. ए. स्पेशल मराठीचा पोपट बोलला आणि एकटाच हसला!

“ आग्रारोडच्या कडेला रोज सकाळ संध्याकाळ हागनदारी बसते... ती बंद करावी लागंल. ”

ग्रामसेवकानं कुरकुरला. त्यावर भरपूर चर्चा झाली. शेवटी दोन दिवस तरी सगळयांनी तिकडे बसू नये असं ठरलं.

“ एखाद्या गाडीवाल्याला पेट्रोल, डिझेल काय बी लागलं तर मी त्ये फुक्ट देईन.. गावातरफे.. ” सदाशिव पेट्रोलकरनं जाहीर केलं. अशी वेळ आपल्यावर येणारच नाही हे त्याला पक्कं ठाऊक होतं.

“ मी पंचर काढून टाकीन... अरजन्ट...फ्री अप चार्ज .. ” मद्रासी अण्णानं पुस्ती जोडली.

अशा आणखी बऱ्याच बारीकसारीक सूचना अनेकांनी केल्या. देणगीचा आकडा कोणालाच जाहीर करावा लागला नाही. त्यामुळे जो तो खुश होता पण पाटील मनातनं खट्टू झाले.

शर्यतीचा दिवस उजाडला.

सकाळी लफ्फेदार फेटा गुंडाळून अन् ठेवणीतला कोट घालून पाटील आग्रारोडच्या कडेला आले. चक्कर मारून त्यांनी तयारीची पाहणी केली. कमानी उभ्या राहिल्या होत्या. त्यांना केळीचे खाांब लावण्यासाठी त्यांनी सर्जेरावाच्या मळयात दोन माणसं

पाठवली. जाणाऱ्या गाडयांवर कोणी दगडफेक करु नये किंवा त्यांना अडवू नये म्हणून तालुक्याहून चार पोलीस आले होते. त्यांचं चहापाणी नाष्टा करायला त्यांनी हॉटेलवाल्याला सांगितलं. पहाटेच कोणीतरी हागनदारी करून गेलं होतं. ते निस्तरण्याचं काम त्यांनी शालेय विद्यार्थ्यांवर सोपवलं.

पाटील असे ऐटीत आलेले पाहून सरपंचांनी ऑफिसातनं चार पाच खुर्च्या अन् टेबल मागवून घेतलं. अहमदनं बॅटरी आणून लाऊडस्पीकर सुरू केला. तो चालू झालेला पाहून अनेकांना स्फुरण आलं. देशभक्तीपर गाणी संपल्यावर हिन्दी गाण्यांचा सिलसिला सुरू झाला. त्याही तबकडया वाजवून झाल्यावर शाळेतली मुलं रेकून गाणी म्हणू लागली.

पाटील, सरपंच,जोशीगुरूजी, रतनशेठ अशी मंडळी खुर्च्यांवर बसली तरी त्यांच्यासमोर बसायला कोणीच तयार होईना. त्यांच्या पाठीमागे उभं राहून अनेक घोळके गाडयांची वाट पाहू लागले. लोक आपण होऊन बसले असते तर पाटलांना लंबंचवडं भाषण ठोकण्याची सुरसुरी आली असती.

ठरल्याप्रमाणे शाळेतल्या काही मुलांना सन्त आणि राष्ट्रीय नेत्यांच्या पोशाखात लाईनबंद उभं करण्यात आलं. बापूजींची वेशभूषा केलेल्या मुलाच्या डोक्यावर मोठे फुगे फोडून अन चिटकवून टक्कल करण्यात आलं. झाशीची राणी झालेल्या मुलीच्या हातात ढालीऐवजी पिपाचं झाकण उलटं करून देण्यात आलं. शिवाजीराजाच्या दाढीमिशांसाठी नारळाचा काथ्या रंगवून वापरण्यात आला. ड्रायवरांना समजावं म्हणून प्रत्येकाच्या गळयात इंग्रजी नावाच्या पाटया अडकण्यात आल्या. एक मुलगी भारतमातेच्या वेशात तर दोन मुली निरांजन घेऊन उभ्या राहिल्या. हा डोलारा कसाबसा तासभर टिकला. गाडया येण्याआधीच तो विस्कळीत होऊन विसर्जित करण्यात आला.

" आलं रे आलं..." एकजण ओरडला.

" पांढऱ्या तोंडाचं माकड आ ऽऽलं.. "

या अनपेक्षित घोषणाबाजीनं पाटील दचकले. त्यांच्या पाठीमागच्या वात्रट घोळक्यातनं ही नारेबाजी होत असताना शर्यतीतली पहिली मोटार सुसाट वेगानं निघून गेली. क्षणार्धात दिसेनाशी झाली. पाटलांनी फेटयाचा छातीवर लोंबणारा पदर मानेभोवती गुंडाळला. हाताशी माईक होताच, तो उचलून मागे वळून घोळक्याची खरडपट्टी काढायला सुरूवात केली,

"वा रे वा...पोरांनो,काय पन तुमची मर्दुमकी...त्यांना माकड म्हनताना लाज नाई वाटत तुम्हास्नी...सादया बैलगाडया हाकलता येत नाई तुम्हास्नी.. आन त्यांना माकड म्हनाया लईच जीभ चुरचुरते तुमची...उद्याला ही पावने मंडळी त्यांच्या देशात गेल्यावरती आपल्या देशाची बेइज्जत करतील त्याचं काय? अशी हाय का आपली भारतीय संक्रुती ?"

" पन त्यानला मराठी कुटं समजतं ?"

टोळक्यातलं कुणीतरी पुटपुटलं अन दबलेली हास्याची लाट येऊन गेली. तेवढयात दुसरी मोटार वाऱ्याच्या गतीनं निघून गेली. पाटलाचं बोलणं ऐकून सरपंचाला स्फुरण आलं. त्यानंही पाठीमागच्या घोळक्याला बरीच दमबाजी केली. तेवढयात तिसरी मोटार डोळयाचं पातं लवतं न लवतं तोच आग्रारोडवरनं दिसेनाशी झाली. जोशीगुरूजींमधला शिक्षक जागा झाला. त्यांनी माईक उचलून सगळयांना गाडी दिसताच " भारत माता की ज ऽऽय ऽऽ" ही घोषणा द्यायला सांगितली.

ही सूचना ऐकताच पाठीमागच्या घोळक्यातनं टाळयांचा कडकडाट झाला अन् "भारत माता की ज ऽऽय ऽऽ" या घोषणेची रंगीत तालीम झाली. याच वेळी चौथ्या मोटारीनं हरणाच्या गतीनं जाण्याचा मुहूर्त साधला.

भोजूचं मात्र पाठीमागच्या कोलाहलाकडे अजिबात लक्ष नव्हतं. तो वडाच्या झाडाखाली बसकण मारून जागतिक शर्यतीतल्या सुसाट वेगाच्या मोटारींचा थरार एकटाच अनुभवत होता. अधनंमधनं त्याला चपटया बाटलीची आठवण येत होती.

त्याच्याजवळ पाण्यानं भरलेली घागर होती. पाचवी मोटार पार होताच त्यानं मागे वळून बघितलं. आपणच एकटयानं गाडयाचा ताफा पाहिला हे लक्षात येताच त्याच्या थापा मारण्याच्या वृत्तीनं उचल खाल्ली.

सगळं स्थिरस्थावर झाल्यावर पाटील, सरपंच अन् गावकरी आग्रारोडकडे एक टक लावून बसले. बराच वेळ तरी एकही मोटार आली नाही. सगळयांची वाट पाहण्याची आतुरता ओसरू लागली. कंटाळा येऊन पाटलांनी भोजूला विचारलं,

" काय रे भोजू ... कशी व्हती पयल्या नम्बरची गाडी ?"

" लईच रुबाबदार.. पाटील.. अवो, तिच्या डायवरनं माला शेकहयांड केला.. "

" आॅ.. शेक हॅण्ड नाई हॅण्ड अप म्हन की ल्येका..."

" हां.. त्येच त्ये.. दुसऱ्यानं मोटार पळवता पळवता आपली कमानीवरची पाटी बी वाचली.. "

" आॅ.. काय.. सांगतोस.. चला.. आपलं गाव धन्य जालं.. !"

" हा.. तिसरा डायवर ...तुमच्याकडं पाहत पाहत ग्येला पाटील.. "

हे ऐकून पाटलांना धन्य.. धन्य वाटलं. इतका डोक्यावर वागवलेला जडबदक फेटा काढून त्यांनी टेबलावर ठेवला. आता तो पेलायची गरज नाही असं त्यांना वाटून गेलं.

" चौथ्यानं सरपंचाची म्हस लई सफाईनं चुकवली...उदळनारच व्हती ती... अक्सिडेंट जाला आसता..."

एकानं माहिती पुरवली.

आपण नाही तरी आपल्या म्हशीनं याची देही याची डोळा शर्यत पाहिली याचं सरपंचाला समाधान वाटलं.

''पाचवा सदाशिवअण्णाच्या पेट्रोल पम्पाकडं लईच बगत बगत ग्येला...त्यांच्या गाडीचं पेट्रोल संपलं.. बहुत्येक.. "

" आता काई शर्यतीत दम नाई.. याच चार पाच गाडयांतनं पईला दुसरा नम्बर निघंल.. उद्याला छापून येईलच पेपरात.. " असं म्हणून चुळबुळत रतनशेट उठले आणि आपल्या दुकानाकडे निघून गेले. हळूहळू घोळका विरळ होत गेला. काही मोटारी जाताना उत्साही लोकांनी " भारत माता की ज ऽऽय ऽऽ" असा जयघोष केला.

दुपारचा दीड वाजत आला. पाटील, सरपंच,जोशी गुरूजी आदी आसनस्थ मंडळीही घरोघरी निघून गेली.

भोजू मात्र भरधाव जाणाऱ्या मोटारींची पावसाप्रमाणे वाट पाहत राहिला. त्यानं घागरीतलं पाणी पिण्यासाठी पेल्यात ओतलं तेवढयात एक मोटार त्याच्याजवळ गच्चकन उभी राहिली. भोजू अवाक् झाला.

" वॉटर...वॉटर...प्लीज.... " मोटारीतला माणूस बोलला.

त्याच्या खाणाखुणावरनं त्याला पाणी हवंय हे भोजूनं ताडलं. घागर घेऊन मोटारीजवळ गेला. त्यानं पाण्याची बाटली भरून घेतली. उरलेलं पाणी ओंजळ करून प्यायला. त्या माणसानं खुश होऊन एक चपटी बाटली भोजूच्या हातात टेकवली. भोजूचं उर आनंदानं भरून आलं. संध्याकाळचा प्रश्न मिटला, तो मनाशी म्हणाला. लघुशंकेसाठी गेलेल्या जोशीगुरूजींनी दूरवरनं हा प्रकार पाहिला. ते पुटपुटले,

" याला म्हणतात... आतिथी देवो भव..."

भोजूला 'कित्ती सांगू मी सांगू कुणाला .. आज आनंदी आनंद झाला ' असं वाटू लागलं. तो धावत पळत गावाकडे निघाला.

oooooo **(जनता टाइम्स दिवाळी अंक १९७०)**

# १२. ढवळी पवळी खिल्लारी जोडी

**प**ती आणि पत्नी ही संसाररुपी रथाची दोन चाकं आहेत, असं लिहिण्या बोलण्याचा आपल्याकडे प्रघात आहे. असं पहिल्यांदा म्हणणाऱ्यानं नक्कीच रथ पाहिला असणार यात शंका नाही. आता ते राजा रजवाडयांचे सुबक सोनेरी रथ इतिहासजमा होऊन चित्रांमधे जाऊन बसले अन् त्यांच्या चाकरुपी नवराबायकोच्या जोडया मात्र कशातरी रडत रखडत,घरंगळत मार्गक्रमण करताना दिसताहेत. यालाच काळाचा अगाध महिमा म्हणावा लागेल! रथ चालायला बैलगाडीपेक्षा अधिक सुखदायी आणि रुबाबदार असणार यात शंकाच नाही. तसल्या रथाच्या चाकांच्या ठिकाणी हल्लीच्या नवरा बायकोच्या जोडयांची नुसती कल्पना करणं तुमच्यासारखं मलाही अवघड वाटतं.

रथाची बैलगाडी कसकशी झाली असावी, याचा विचार करत रस्त्यानं जाताना शंकरराव आणि पार्वतीबाई यांचं जोडपं येताना दिसलं. शंकररावांनी मला पाहिल्यावर थांबणं भागच होतं. दोघांची जाईच्या गजऱ्याची चोखंदळ खरेदी चालली होती. आता या वयातही शंकरराव आपल्या बायकोसाठी गजरा विकत घेतात, याचंच मला मोठं नवल वाटलं. ते काही वर्षांपूर्वीच सेवानिवृत्त झाले. पूर्वी त्यांना असं सार्वजनिक ठिकाणी दिलखुलास वागताना ,वावरताना बघितलं असेल तर शपथ! करारी, शिस्तप्रिय आणि चाकोरीनिष्ठ अशीच त्यांची ख्याती होती. आज ते प्रसन्नपणानं बायकोसह खरेदीत रस घेताहेत, हे दृश्यच मुळी ' चित्तचक्षु चमत्कारिक ' होतं. म्हणूनच माझ्यासारखे आणखी चारजण त्यांच्याकडे चमकून पाहू लागले . कशामुळे झालं असेल हे परिवर्तन? गेली अनेक वर्षं मी त्यांना ओळखतो. पण कधीही,कुठंही त्यांना सपत्नीक पाहिल्याचं मला काही स्मरत नाही. टांग्याच्या घोडयासारखे ते झापडबंद जगले. मग हे असं कसं झालं? न राहवून मी त्यांची विचारपूस केली तेव्हा ते म्हणाले, " अहो, थोडीच वर्षं उरली आमच्या सहजीवनाची! आमच्या हिला गजऱ्याची हौस आहे हे उमगायला मला तब्बल चाळीस वर्षं लागली!" मला हळूच कोपरखळी मारत ते लगेच म्हणाले, "नाही तर तुमची पिढी ! आपल्या हिला काय आवडतं ,हे ओळखायला तुम्हाला चाळीस सेकंदसुद्धा फार झाली!!"

शंकररावांच्या या बोलण्यावर काय बोलणार ? आता,चाळीस सेकंदाच्या अवधीतच आपल्या जोडीदाराला जाणून घेण्याचाच जमाना आला आहे खरा , पण अशा सेकंदांच्या शिकस्तीत जन्मजन्माची ओळख कशी पटणार? त्यासाठी अजूनही अनुभवाच्या पारदर्शक बरणीत 'प्रेमाचा गुलकंद 'मुरवण्याची गरज आहेच. तेव्हा कुठे परस्परांबद्दल धोडंफार ठामपणानं बोलता येणार! शंकरराव फटकळ, बोलघेवडया स्वभावाचे तर पार्वतीबाई अबोलीच्या फुलासारख्या! त्यांची अव्याहत बडबड त्यांना रुचत असेल का? त्यांच्यासह ठराविक चाकोरीत चालताना केवढी दमछाक झाली असेल? झापडबंद घोडयाचे लगाम खेचता खेचता केवढे नाकीनऊ आले असतील? पार्वतीबाईंच्या अगतिकतेला ,सोशिकतेला सलामच केला पाहिजे!

थोडा पुढे गेलो. एका देवळासमोर रुक्मिणीबाईंचं तारस्वरातलं बोलणं सहज कानांवर पडलं. त्या पाचदहा माणसांशी एकाच वेळी बोलत असाव्या असं वाटून मी वळून पाहिलं तर विठ्ठलराव केविलवाण्या अवस्थेत बायकोच्या आज्ञेची वाट पाहात उभे असलेले दिसले. चौकशी केल्यावर समजलं असं की, रुक्मिणीबाई एका नारळवाल्यावर आणि आपल्या नवऱ्यावर जाम चिडल्या होत्या. काही वेळापूर्वी रस्त्यावरच्या नारळवाल्यानं पारखून, गॅरंटीसह दिलेलं नारळ विठ्ठलरावांनी हातात घेऊन लगेच रुक्मिणीबाईच्या स्वाधीन केलं होतं. देवळात जाऊन फोडल्यावर ते नासकं असल्याचं लक्षात आलं. तेव्हापासनं

बिचाऱ्या विठ्ठलरावांच्या कंबक्तीला सुरूवात झाली! ते काही नारळाच्या पोटात शिरले नव्हते. तळण करणाऱ्या तमाम बायकांना 'वडयाचं तेल वांग्यावर काढण्या'ची कला अवगत असतेच. 'आवळा देऊन कोहळा' मिळविण्यात पुरुषांपेक्षा आपणच वाकबगार असतो, असा हरेक बाईचा दावा असतो. यामुळे हरेक नवऱ्याची अवस्था 'दाव्याला बांधलेल्या बैला'सारखी न झाली तरच नवल! विठ्ठलरावांनी घासाघिस आणि खातरजमा न करता पैसे दिले, हा रुक्मिणीबाईंच्या दृष्टीनं घोर अपराध होता. त्यात पुन्हा नारळवाला बेपत्ता झाल्यामुळे नवरोजींना 'तोफेच्या तोंडी' देण्यावाचून रुक्मिणीबाईंना दुसरं गत्यंतरच नव्हतं!! त्यांच्या तोंडात अगदी तीळ भिजत नव्हता आणि विठ्ठलरावांच्या अंगाचा जागच्या जागी तिळपापड होत होता!! पुरुषांनी घरभर पसारा करायचा असतो आणि बायकांनी तो आवरायचा असतो, हे कविसम्मेलनात म्हणायला आणि ऐकायला बरं वाटतं. प्रत्यक्षात दोघांनी 'बाऽचाऽबाऽची'चा पसारा मांडला तर दोघांनाही आवरायला फारच कठीण जातं.

घरी आलो. दृष्टीरुपी पक्षिणी खिडकीतनं शेजारच्या घरात गेली. तिथं विष्णुपंत आणि लक्ष्मीकाकुंचं दबक्या आवाजातलं दोघांचं भांडण ऐन रंगात आलं होतं. घर म्हटलं की 'भांडयाला भांडं लागणार'च या धर्तीवर नवरा बायको म्हटले म्हणजे 'भांडणाला भांडण' लागणार अशी नवी, कोरी करकरीत म्हण सगळयांनी 'म्हणा'यला काय हरकत आहे? त्यांच्या भांडणाचा विषय काही कळला नाही. पण नवराबायकोच्या भांडणाला विषयच लागत नाही म्हणा किंवा कोणताही विषय चालतो म्हणा! झटपट 'विषयांतर' ही अशा भांडणाची खासियत म्हणावी लागेल ! लहान मुलं पाटीवर १ते १० आकडे मांडून 'म्हातारीच्या रेषेचा खेळ' खेळतात ना,तसल्या प्रकारचं हे भांडण असतं. कोणत्याही आकडयावरनं कोणत्याही आकडयावर जाताना त्या खेळातल्या रेषा एकमेकांना भिडल्या तर एक भिडू बाद होतो. इथले 'भिडू' मात्र नाबाद राहण्याच्या आवेशात एकमेकांचा 'भडका' कसा होईल? हे जोखत जोखत भांडत असतात. खिडकीतनं पाहिलं तर शेषशाही नागाच्या अंगावर पहुडल्यासारखे विष्णुपंत पलंगावर कलंडलेले व पायगती बसून लक्ष्मीकाकू भनकलेल्या ! !

इथं ही तऱ्हा तर तिकडे गणपतराव आणि शारदाबाईंची दुसरीच. बेताच्या उत्पन्नातनं गणपतराव बायकोसाठी सतत नवनव्या साडया विकत आणतात तरी शारदाबाईंच्या चेहऱ्यावर एखादी तरी स्मितरेषा? छे ऽऽ नाव नाही!! उद्या गणपतरावांना अगदी लॉटरी लागली आणि त्यांनी वर्षाच्या तीनशे पासस्ट साडया एकदम खरेदी केल्या तरी शारदाबाई कुरकुरत म्हणतील, "खरं तर किनई ऽऽ दहा वर्षांच्या साडया घ्यायला काय हरकत आहे? बायकांच्या सहवासात राहून तमाम साडी दुकानदार मवाळ होत असावेत,असं मला नेहमी वाटतं. त्यांच्या बायकांच्या साडी खरेदी प्रसंगी 'एखादे तरी भांडण' होत असेलच ना? हे 'पदराखालच ंगुपित' अजून कोणत्याही साडी दुकानदारानं उघड केल्याचं ऐकीवात नाही.

चमेलीबाई माहेरी गेल्या म्हणून गुलाबराव माझ्याकडे येऊन बसले होते. हरदासाचं प्रवचन जसं मूळ पदावर येतं, तसं त्यांच्या बोलण्यात चमेलीबाई वारंवार चमकत होत्या. दोघांचं'शुभमंगल' झालं तेव्हा चमेलीबाईंनी नाव घेताना म्हटलं होतं : "चांदीच्या वाटीत फणसाचे गरे, दिसताहेत बरे ,वागवतील तेव्हा खरे". गुलाबरावांची पाळी आल्यावर ते म्हणाले : "चांदीच्या वाटीत सोन्याची सरी, दिसतेय बरी ,नीट वागेल तेव्हा खरी". त्यावेळी तिथं आमच्या ठमाकाकू हजर होत्या. त्या उद्‌गारल्या " पुरुषांचं काही खरं नाही. दिवसा म्हणतील केरसुणी आणि रातच्याला हेमामालिनी'" आता बोला !!

००००० **(नगारा दिवाळी अंक : २००७ )**

# ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रांनो

हल्ली टिव्हीवर एक जाहिरात तुम्ही पाहिली असेल. बहुमजली इमारतीतल्या एका मुलाचा मोबाईल खिडकीच्या छज्ज्यावर पडतो. तो मुलगा बाजूला लावलेल्या बांबूच्या परातीवरून छज्ज्यावर उतरतो. आणि त्याच क्षणी ती अक्खी परात धडधडा खाली कोसळते. तो मुलगा लगेच मोबाईलवर एक नंबर लावतो. आणि संता-बंताचे विनोद ऐकायला सुरूवात करतो. कारण त्याक्षणी इतर कोणत्याही मदतीआधी त्याला स्वतःचे मन शांत करणे जास्त आवश्यक असते.

साहित्य आणि त्यातही विनोद म्हणजे आजच्या माणसाच्या रूक्षशा आयुष्यात एक खळखळता झरा... आपण प्रत्येक क्षणालाच हसण्याची आणि आनंदी असण्याची कारणं शोधत असतो. आपल्याला आलेला एखादा विनोदी एसएमएस असो, व्हॉट्सॅप मेसेज असो, आपण पाहिलेला एखादा विनोदी व्हिडिओ असो किंवा एखादं गमतीशीर चित्र, व्यंगचित्र असो आपण क्षणार्धात एक टिचकी मारून आपल्या मित्रपरिवारापर्यंत पोहोचवतो. विनोदानं आपल्या आयुष्यातला एक क्षण सुंदर केलेला असतो आणि हा विनोद शेअर करून आपण आपल्या आप्तेष्टांमध्ये शेकडो क्षण सुंदर बनवतो. तंत्रज्ञानानं दिलेल्या सोयींचा यापेक्षा सुंदर आणि सुलभ उपयोग तो काय असावा?

आम्ही गेल्या जवळ जवळ सहा वर्षांपासून मराठी भाषेसाठी हेच काम करत आहोत. तंत्रज्ञानानं पुरवलेल्या सोयींचा फायदा घेऊन नुसता विनोदच नाही तर साहित्याचा प्रत्येक रस लाखो मराठी लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवण्याची आमची धडपड सुरू आहे. ई-साहित्य प्रतिष्ठानचे आज जगभरात २ लाख वाचक आहेत. आकडा अभिमान वाटण्यासारखा वाटतो.

पण हा मराठी भाषा बोलणाऱ्या लोकसंख्येच्या एक टक्काही नाही. आजवर ३००हून अधिक मराठी ई-पुस्तकं आम्ही प्रकाशित केली. पण आजही लाखो ई-पुस्तकांची श्रीमंती सांगणाऱ्या इंग्रजीच्या तुलनेत हा आकडा नगण्यच आहे. आम्ही असमाधानी आहोत. पण निराश नाही.

आम्ही रोज नव्या जोमाने उभे राहतो. मराठी भाषेतील ई-पुस्तकांनी आपलं जगणं नुसतं सुंदरच नाही तर समृद्ध करण्यासाठी. ई-साहित्य प्रतिष्ठानला या कार्यात वाचकांची मदत हवी आहे. मदत करायची कशी? पैसा नको, तुमचा फार वेळही नको आम्हाला. हवा आहे तो फक्त तुमचा विश्वास. तुम्हाला हे पुस्तक किंवा ई-साहित्य प्रतिष्ठानचं कोणतंही पुस्तक आवडलं असल्यास एक टिचकी मारून आपल्या मित्रजनांना फॉरवर्ड करा. त्यांचे ई-पत्ते आम्हाला कळवा esahity@gmail.comवर. आपल्या मित्रयादीतील जास्तीत जास्त लोकांपर्यंत हे कार्य पोहोचवण्यास तुम्ही आम्हाला मदत केलीत तर तुमचा आमचे VIP सभासद म्हणून आम्ही वेगळा मान ठेऊच. यापुढील प्रत्येक पुस्तकाची पहिली प्रत तुमच्याकडे येईल. प्रत्येक नवीन योजनेसाठी तुमच्याशी विचारविनिमय करू. तुम्ही दिलेल्या सूचनांवर खास अंमल करू. कारण मराठी साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेण्यासाठी तुम्ही मनापासून प्रयत्नशील आहात.

प्रत्येकाच्या सहकार्यानं आणि पूर्ण जोशानं आपल्याला मिळून हे कार्य किमान १२ लाख लोकांपर्यंत पोहोचवायचं आहे. बारा लाख म्हणजे एक टक्का मराठी माणूस. तो असेल आपला पहिला टप्पा. चला तर मग कामाला लागूया. आमचा ई-पत्ता आहे esahity@gmail.com आणि संकेतस्थळ आहे www.esahity.com! कृपया आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते कळवा.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य